मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
३२६९
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
दा. क्र. ३२६९
IRBK-0103269
IRBK-0103269

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा० वा०
क्र. ३२६९

# मुलांचें स्वराज्य

ल. नी. छापेकर

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

IRBK-0103269

१९५०

किंमत दहा आणे

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉंटिनेंटल प्रकाशन,
१९६/१९ सदाशिव, पुणे २

सर्व हक्क लेखकाकडे

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१, शनवार, पुणे २

३२६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# पुरवणी वाचनमाला

प्राथमिक शाळेंतील इ. ५, ६, ७ व माध्यमिक शाळेंतील इ. १, २, ३ या वर्गांसाठीं आम्हीं एक पुरवणी-वाचनमाला श्री. ल. नी. छापेकर यांच्या साहाय्यानें तयार करीत आहोंत. या वाचनमालेचे विशेष असे—

❀ प्रत्येक वर्गासाठीं तीन पुस्तकें असतील. प्रत्येक पुस्तकाचीं पानें कमींत कमी ४८.

❀ प्रत्येक गटांत कथा, स्वभावचित्रें व नागरिक—नीतिविषयक प्रसंगचित्रें इत्यादींचा समावेश आहे.

❀ या मालेमुळें वाचनाची आवड लागेल. पुस्तकाचा अभ्यास कसा करावा हें समजेल.

❀ प्रत्येक इयत्तेसाठीं एक पेटी करून हीं पुस्तकें ठेविल्यास गैरहजर शिक्षकांच्या तासाला, जोडवर्ग घेतांना मुलांना चांगला, हेतुपूर्ण व आवडता व्यवसाय देतां येईल.

ह्या प्रकारें एका इयत्तेला तीन पेट्या केल्यास सोयीचें होईल—मग त्या इयत्तेच्या तुकड्या कितीहि असोत.

गेल्या वर्षीं या मालेंतील ' उसना मेवा ' हें पहिलें पुस्तक तयार झालें. आज ' मुलांचें स्वराज्य ' हें दुसरें पुस्तक तयार होत आहे.

विनंती कीं, आपण हीं पुस्तकें आपल्याकडील सर्व शाळांत लावून घ्यावींत व या आमच्या प्रयत्नाला हातभार लावावा.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय [illegible].
क्र. ...३२६९ ता. दि. ...
वि. ...

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | असें प्रदर्शन भरवा. | ७ |
| २ | शाळेंतली कोजागिरी. | १५ |
| ३ | महात्माजींच्या पुण्यस्मृतीसाठीं. | २२ |
| ४ | एकमेकां साह्य करूं. | ३० |
| ५ | मुलांच्या न्यायालयांत. | ३६ |
| ६ | मुलांनीं शाळा चालविली. | ४४ |
| ७ | घरचे आहेर. | ५१ |

संग्रहालय
अनुक्रम 28834
दि. भाग ...
क्रमांक 1908
दि. 3/13/61

# असें प्रदर्शन भरवा.



वार्षिक परीक्षा संपली होती. शाळेला दहा दिवसांची सुटी लागणार होती. सुटी लागण्याच्या आंत स्वराज्यसभेनें एकादी सुंदर योजना आंखावी व सुटींत त्या योजनेसाठीं सारी व्यवस्था करावी असें मला वाटलें.

दुसऱ्याच दिवशीं मी मुख्याध्यापकांना भेटलों व माझा विचार त्यांना कळविला. त्यांची परवानगी घेतली व स्वराज्य-सभेच्या मंत्र्यांना मीं दुपारीं शाळेंत एकत्र बोलाविलें. सभेपुढें मीं विषय मांडला—

"अद्याप सुटी लागायला पांचसहा दिवस अवकाश आहे. या दिवसांचा उपयोग आपल्याला चांगल्या प्रकारें करतां आला पाहिजे. सर्व मुलांना चांगलेंसें काम देतां आलें पाहिजे; यासाठीं मी असें म्हणतों कीं, आपण सुटी संपल्यावर पहिल्याच आठवड्यांत एक सुंदर प्रदर्शन भरवूं."

" होय, कल्पना छानच आहे. नाहीं तरी हे दिवस मुलें फुकटच घालवितात. " सदू म्हणाला.

" तें खरें; पण प्रदर्शन कसलें कसलें भरवायचें ? कोठें भरविणार ? त्याचा खर्च कोण करणार ? याचा नको का विचार करायला ? " गोविंदानें शंका प्रदर्शित केल्या.

" या गोष्टींचा मीं विचार केला आहे ना ! एक तर, या कार्यक्रमाला फारसा खर्च येणार नाहीं. शिवाय थोडासा खर्च शाळा करील असें मुख्याध्यापक म्हणाले. पण त्याचीहि जरूरी पडणार नाहीं. " मी म्हणालों.

" तें कसें ? " सदूनें विचारलें.

" हें प्रदर्शन आपण शाळेंतच मांडणार आहोंत. प्रत्येक वर्गानें आपापलें साहित्य तयार करून आपल्या ताब्यांत द्यावयाचें. हें कार्य सुटीच्या अगोदर झालें पाहिजे. मग आपण सुटींत ठरवूं प्रदर्शन कसें, केव्हां मांडायचें तें. " मीं खुलासा केला.

सर्वांनीं माझ्या म्हणण्याला रुकार दिला. दुसऱ्या दिवशीं शाळेंत एक सूचना फिरविली गेली. सूचनेंत काय लिहिलें होतें ?—

> " प्रत्येक वर्गानें आपापली सभा घ्यावी व प्रदर्शनाकरितां कोण-कोणत्या वस्तू करावयाच्या हें ठरवावें. त्याप्रमाणें वस्तू तयार करून आपापल्या वर्ग-शिक्षकांकडे द्याव्या."

त्याच दिवशीं निरनिराळ्या वर्गांच्या सभा सुरू झाल्या. प्रत्येक वर्गाला वाटे आपण कांहीं तरी अगदीं नवीन नवीन वस्तू कराव्या व आपल्या वर्गाला बक्षिस मिळवून द्यावें.

ही पहा इयत्ता ४ थीची सभा सुरू आहे. प्रत्येक मुलगा आपण काय करणार हें सांगत आहे. शेवटीं इ. ४ थीचा कार्यक्रम असा ठरला—

" आपल्या वर्गांचे उत्कृष्ट सूतकताईचे निदान चार नमुने द्यावयाचे.
आपल्या वर्गाचें एक सुरेख हस्तलिखित तयार करावयाचें.
कागदाच्या कातरकामाचे निदान सहा नमुने प्रदर्शनासाठीं तयार करावयाचे.
पानें, फुलें यांचे दोन शक्य तितके मोठे संग्रह तयार करून पाठवावयाचे."

अशा प्रकारें प्रत्येक वर्गानें आपापला कार्यक्रम आंखला. कोणी कोणी काय काय करायचें हें ठरवितांना फार त्रास पडला. एकाच वस्तूसाठीं चार-पांच नांवें आलीं म्हणजे फार त्रास पडे. शेवटीं गुरुजी सांगत व तो निर्णय मानला जाई.

तीन दिवसांत सारें संपवावयाचें असल्यामुळें कोणीं कामाचा आळस केला नाहीं. सकाळ-दुपार मुलें शाळेंत येत व आपापलीं कामें करीत. प्रत्येक वर्ग म्हणजे सुंदर सुंदर वस्तू तयार करण्याचा एक कारखानाच झाला होता. अनेक चिमुकले हात कामाला लागले होते. तीन दिवस खूप काम करून मुलांनीं अनेक वस्तू तयार केल्या व आपापल्या वर्गशिक्षकांकडे दिल्या.

शेवटच्या दिवशीं शाळा चार तासानंतर सुटणार होती. प्रथम परीक्षेचा निर्णय सांगण्यांत आला. नंतर सर्व मुलांना एकत्र आणलें व मुख्याध्यापकांनीं सुटीपूर्वीचा निरोप दिला. निरोप देतांना ते म्हणाले—

“ मुलांनो, परीक्षेचा निर्णय एकूण फार चांगला आहे. मी तुमचें त्यासाठीं अभिनंदन करतों. पण त्यापेक्षां मोठी गोष्ट तुम्हीं गेल्या तीन दिवसांत केली आहे. स्वराज्यसभेनें ठरविलेल्या कार्यक्रमासाठीं तुम्ही खूप मेहनत घेऊन वस्तू तयार केल्या आहेत. सुटीनंतर त्यांचें प्रदर्शन मांडलें जाईल. तुम्हांला, तुमच्या पालकांना तें पाहायला मिळेल. या प्रदर्शनांत वैयक्तिक व सांघिक वर्गांसाठीं अशीं दोन्ही प्रकारचीं बक्षिसें ठेवावयाचीं आहेत. सांघिक बक्षिसांसाठीं मुख्यतः या गोष्टींचा विचार होईल—

**विविध प्रकारच्या पण उपयुक्त अशा वस्तू असाव्यात.**
**वर्गांतल्या सर्व मुलांनीं त्यांत भाग घेतलेला असावा.**
**एकूण प्रदर्शनांत वैयक्तिक बक्षिसें पण मिळालेलीं असावींत.**

तुम्हीपण या गोष्टींचा पुन्हा विचार करा. तुम्हांला मी माझ्यातर्फे आणखी दोन दिवस देतों. त्या वेळेचा उपयोग तुम्ही जरूर त्या सुधारणा करण्यासाठीं करा.

या प्रदर्शनासाठीं स्वयंसेवकांचीहि जरूरी लागेल. ज्यांना स्वयंसेवक म्हणून काम करावयाचें असेल त्यांनीं महाजन गुरुजींकडे नांवें द्यावींत.”

सभा संपली. मुलें उत्साहानें घरीं गेलीं.

* * *

मुख्याध्यापकांनीं दिलेली अधिक मुदत संपल्यावर आम्ही स्वराज्य-सभेची बैठक घेतली. बैठकींत प्रदर्शनाचा आराखडा तयार करावयाचा होता. तें मांडण्याची व्यवस्था करावयाची होती. बक्षिसें वगैरेंची योजना आंखावयाची होती. आजच्या सभेसाठीं मुद्दाम मुख्याध्यापकांनाहि बोलाविलें होतें. हेतु हा कीं, योग्य वेळींच त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळावें.

सभा सुरू झाली. शेजारीच चारपांच टेबलांवर साऱ्या वस्तू वर्गवार ठेवल्या होत्या. महाजन गुरुजी म्हणाले, " आपण या वस्तूंची नीट विभागणी करूं या. कातरकाम, पुठ्ठयांचीं कामें, कताई, विणकाम, निसर्गनिरीक्षण, लेखन, सुतारकामें, चित्रें, विविधसंग्रह, मातकाम इत्यादि. शिवाय या प्रत्येक विभागांत पोट-विभाग येतीलच. "

" हें काम कोणाकडे द्यावयाचें ? " गंपूनें विचारलें.

" हें काम साऱ्यांचेंच. सभा संपल्यावर आपण हें काम आजच करून टाकूं." महाजन गुरुजींनीं सांगितलें.

" यासाठीं बक्षिसांची योजना करायची म्हणजे किती तरी बक्षिसें लागतील. प्रत्येक पोटविभागाला निदान एक तरी बक्षीस पाहिजे; नाहीं का ? " कुसुमनें विचारलें.

" होय तर ! मला तर वाटतें कीं, निदान चाळीस-पंचेचाळीस बक्षिसें ठेवावीं लागतील." सदू म्हणाला.

यानंतर याप्रमाणें प्रत्येक बाबतींत नीट चर्चा होऊन गोष्टी ठरल्या—

शाळा उघडल्यानंतर पंधरा दिवसांनीं प्रदर्शन मांडावें.

प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठीं बाहेरचे पाहुणे बोलवावे.

प्रदर्शन मांडणें, बक्षिसांची योजना करणें, स्वयंसेवक-पथकाचें काम पाहणें. समारंभाची व्यवस्था करणें इत्यादि कामांसाठीं समित्या नेमल्या गेल्या.

अनुक्रम ११
विभाग
ग्रंथांक ११०
दि. ३१

**प्रत्येक विभागांत निदान तीन पोट-विभाग पाडावे— इ. १, २, इ. ३, ४, इ. ५, ६, ७ याप्रमाणें प्रत्येक पोट-विभागासाठीं पुस्तकरूपानें बक्षिसें ठेवावींत.**

**बक्षिसाची रक्कम शक्य तितकी देणगीरूपानें मिळवावी.**

* * *

सभा संपल्यावर आम्हीं साऱ्या वस्तूंचें वर्गीकरण केलें. चित्रकलामंदिरांत साऱ्या वस्तू नेऊन ठेवल्या.

दुसऱ्या दिवसापासून निरनिराळ्या समित्या आपापल्या कामाला लागल्या.

'निधी'—समितीनें लवकरच शंभर रुपयांचा निधी गोळा करून मुख्याध्यापकांकडे दिला.

'मांडणी'—समितीनें संपूर्ण आराखडा प्रथम तयार केला व त्याप्रमाणें एक एक विभाग मांडून संपूर्ण मांडणी मोठ्या आकर्षक रीतीनें केली.

'स्वयंसेवक'—समितीनें स्वयंसेवकांचा तीन दिवसांचा एक वर्ग चालवून व त्यांचें कार्य त्यांना उत्तम प्रकारें समजावून सांगून उत्तम पूर्वतयारी केली.

असें काम होत होतें. शाळा सुरू झाल्यावरहि कार्य सुरूच होतें. त्याला खंड नव्हता. सारीं मुलें प्रदर्शनाची मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहत होतीं. चित्र-कलामंदिराकडे रोज मुलें एकदां तरी जाऊन येत.

* * *

शेवटीं प्रदर्शनाचा दिवस उजाडला. शाळेचें सारें वातावरण खुलून गेलें. पताका, आंब्याचीं तोरणें यांनीं आवार सुशोभित केलें होतें. मुलें आवारांत ठिकठिकाणीं उभे राहून प्रदर्शनाच्याच गप्पा मारीत होतीं. शाळेच्या पथकाचें वृंदवादन सुरू होतें. पाहुण्यांना सलामी देण्यासाठीं गणवेषधारी मुलें रांगेत उभीं होतीं. सारी जय्यत तयार होती.

इतक्यांत पाहुण्यांना घेऊन मुख्याध्यापक आले. शिटी फुंकली गेली. मुलांनीं सलामी दिली. पाहुण्यानीं नमस्कार केला व ते सभास्थानीं गेले.

नेहमींच्या पद्धतीनें ईशस्तवन झालें. स्वराज्य-सभेच्या चिटणिसाचें स्वागत-पर भाषण झालें. मुख्याध्यापकानीं प्रास्ताविक भाषण केलें. ते म्हणाले—

" बंधूंनो, भगिनींनो व मुलांनो, आजचा दिवस मोठा भाग्याचा. या प्रदर्शनाचें सारें सारें काम मुलांनींच केलें आहे. आणि या प्रदर्शनाचें उद्‌घाटन करायला तुम्हां मुलांचे आवडते गुरुजीच येथें आले आहेत. त्यांनीं प्रथम प्रदर्शनाचें उद्‌घाटन करावें व मग येथें येऊन आपला अभिप्राय द्यावा व भाषण करावें. प्रदर्शनांतील वस्तूंना बक्षिसें ठरविण्यासाठीं एक समिति नेमली होतीच. त्या समितीनें काम पूर्ण केलें आहे. पाहुण्यांच्या भाषणानंतर बक्षिसांचा निर्णय वाचून दाखविला जाईल."

पाहुणे प्रदर्शन उघडायला व पहायला गेले. चित्रकलामंदिराचें कुलुप उघडल्याबरोबर वृंदवादन पथक सुस्वर आवाजांत गीत वाजवूं लागलें. उद्‌घाटन झाल्याचें सभेला त्यामुळें सहजच समजलें. प्रदर्शनाचे विविध विभाग त्यांनीं मोठ्या कौतुकानें पाहिले.

इ. ४ थीच्या मुलांचें ५० नंबरी कसदार सूत पाहून त्यांना फार आनंद झाला.

इ. ६ वीचें 'हस्तलिखित' त्यांनीं पाहिलें. पाहतां पाहतां ते त्यांत रंगले. त्यांतील अक्षर, चित्रें, लेखनाचे विषय यांची त्यांना खूप मौज वाटली.

मुलींनीं केलेल्या भरतकामानें तर त्यांना अगदीं खूष केलें. रुमालांत विणलेला भारताचा नकाशा, अनेक वेलबुट्ट्या, निरनिराळ्या कपड्यांवर विणलेलीं महात्माजींचीं चित्रें पाहून ते म्हणाले, " किती कला भरली आहे आपल्या घरोघरीं ! "

* * *

साऱ्या प्रदर्शनावर एकदां दृष्टिक्षेप टाकून ते सभास्थानीं परत आले. श्रोते त्यांची वाटच पाहत होते. आल्याबरोबर त्यांनीं आपल्या भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले—

" या प्रदर्शनाचें उद्‌घाटन करायला मला संधि मिळाली हें मी माझें भाग्य समजतों. हें सार्धे प्रदर्शन नाहीं. आपल्या देशांत कलेचें बीज कसें रुजलें आहे, त्याला खतपाणी आपण योग्य वेळीं दिलें तर त्याचे कसे डौलदार वृक्ष होतील याचें प्रत्यक्ष दर्शन घडवून देणारें हें प्रदर्शन आहे. या प्रदर्शनांतील विशेष तेथील एका फलकावर लिहिलेले आहेत.

**शाळेतील ३५० मुलांपैकीं ३०४ मुलांनीं या प्रदर्शनांत प्रत्यक्ष कार्य करून भाग घेतला आहे.**

**अनेक निरुपयोगी वस्तूंचा उपयोग करून अनेक सुंदर व उपयुक्त वस्तू तयार केल्या आहेत.**

**योजना आंखण्यापासून तों ती शेवटास नेईपर्यंत सारीं कामें मुलांनींच केलीं आहेत.**

या दृष्टीनें हें प्रदर्शन विशेषच आहे. तुम्ही सर्वांनीं हें प्रदर्शन पहावें. मुलांच्या कामाचें कौतुक करावें. सक्रिय सहानुभूति दाखवावी व मुलांना पुढील मोठमोठीं कामें करायला उत्तेजन द्यावें."

उद्घाटनाचें भाषण संपल्यावर चिटणिसांनीं अहवाल वाचून दाखविला. बक्षिसांचा निर्णयहि वाचून दाखविला. अहवालांतील मुख्य मुद्दे असे—

प्रदर्शनासाठीं त्यांचेकडे एकूण ९०० चे वर वस्तू आल्या होत्या. त्यांतील ४२० वस्तू निवडून प्रदर्शनांत मांडल्या होत्या. प्रदर्शनाचे सोई-साठीं एकूण पन्नास पोट-विभाग करावे लागले होते. सांघिक बक्षीस इयत्ता सहावीला मिळालें होतें. इयत्ता तिसरीला दुसऱ्या नंबरचें सांघिक बक्षीस मिळालें होतें. वैयक्तिक बक्षिसें एकूण ५० दिलीं होतीं.

यानंतर समारोप, आभार-प्रदर्शन, राष्ट्रगीत इत्यादि कार्यक्रम होऊन सभा संपली.

प्रदर्शन त्यानंतर आठ दिवस उघडें ठेवलें होतें. बहुतेक पालकांनीं प्रदर्शनाला भेट दिली. कांहींनीं आपण होऊन बक्षिसें दिलीं. मदतीच्या पेटींतहि शेवटीं साठ रुपये निघाले.

प्रदर्शन यशस्वी झाल्यामुळें आमचा आत्मविश्वास खूपच वाढला होता. या वर्षी आणखी मोठें काम अंगावर घेऊं असें सारे सभासद म्हणत होते. हें जेव्हां आम्हीं महाजन गुरुजींना बोलून दाखविलें तेव्हां ते म्हणाले—

"अवश्य करूं; पण आतां आपला रोजचा कार्यक्रम प्रथम नीट करायला पाहिजे ना! तो रोज चांगला झाला कीं, अशीं कामें आपो-आपच होतील."

## अभ्यास

( १ ) प्रदर्शनाच्या तयारीसाठीं परीक्षेनंतरचे दिवस कां निवडले? सुटीचा उपयोग कशासाठीं केला गेला?

( २ ) प्रदर्शनासाठीं स्वराज्य-सभेला कोणकोणतीं कामें करावीं लागलीं? त्यासाठीं त्यांनीं कोणती व्यवस्था केली?

( ३ ) या प्रदर्शनाचे विशेष गुण कोणते होते?


( ४ ) सांघिक बक्षीस कोणकोणत्या गोष्टी पाहून दिलें गेलें? असें कां केलें?

( ५ ) चिटणीसांना कोणकोणतीं कामें करावीं लागलीं?

( ६ ) श्री. महाजन गुरुजींनीं कोणती जाणीव करून दिली? त्यांच्या म्हणण्याचा उद्देश कोणता?

( ७ ) तुमच्या वर्गातर्फे एकाद्या रविवारीं छोटेसें प्रदर्शन भरवा.

( ८ ) प्रदर्शित करणें, साहित्य, रुकार देणें, वैयक्तिक, सांघिक, स्वयंसेवक, निरीक्षण, पूर्वतयारी, सुशोभित करणें, स्वागतपर, वृंदवादन, दृष्टिक्षेप, उद्घाटन, या शब्दांचे अर्थ सांगा.



# २

# शाळेंतील कोजागिरी



एका खेडेगांवची गोष्ट. तेथें एक छोटीशी शाळा होती. शाळेंत सुमारें तीनशें मुलें होतीं. सात शिक्षक होते. शाळेकडे गांवकऱ्यांचें लक्ष असे. शाळाहि गांवलोकांकडे लक्ष पुरवी.

शाळेंत निरनिराळे उत्सव साजरे करीत. कांहीं प्रसंगीं पालकांनाहि शाळेंत बोलावीत. साक्षरताप्रसाराचें, समाजशिक्षणाचें, कलाकौशल्याचें इत्यादि अनेक कामें शाळेंतच होत. शाळा म्हणजे जणूं गांवाचें केंद्रस्थानच.

आश्विन महिन्याचे दिवस होते. पावसाचा जोर बराच कमी झाला होता. शरद ऋतूचें चांदणें पडूं लागलें होतं. ज्वारीच्या पिकांचा जिकडे तिकडे सुखद सुवास पसरला होता. शाळेंत कोजागिरीचा उत्सव साजरा होणार होता.

शिक्षक, मुलें, पालक व कांहीं प्रतिष्ठित गांवकरी या उत्सवांत भाग घेणार होते.

एके दिवशीं शंकर वडिलांना म्हणाला, "बाबा, आमच्या शाळेंत कोजागिरी आहे. प्रत्येक मुलाला चार आणे वर्गणी येईल."

"उद्यां सकाळीं देईन चार आणे." वडील म्हणाले.

"पण...... !" शंकर बोलतांना अडखळला.

"अरे 'पण' काय ?"

"मला तुम्ही निदान आठ आणे तरी द्या." शंकर म्हणाला.

"अरे हें काय ? तूंच तर म्हणालास चार आणे वर्गणी आहे म्हणून ! मग आणखी चार आणे कशाला ?"

"ती पण वर्गणीच. पण माझ्यासाठीं नाहीं. आमच्या पांचवीच्या वर्गानें ठरविलें आहे कीं, वर्गातल्या सर्व मुलांना कोजागिरीला न्यायचें. पण वर्गात कांहीं गरीब मुलें आहेत. त्यांची वर्गणी कोणी द्यावी ?"

"सर्व मुलें किती वर्गणी आणणार आहेत ?"

"आमच्या वर्गात छत्तीस मुलें आहेत. आम्ही नऊ रुपये गोळा करून वर्गातर्फे देणार आहोंत. शक्य असेल तेवढी जास्त वर्गणी प्रत्येकानें आणा-यची असें ठरलें आहे."

"तुमच्या गुरुजींना माहीत आहे का पण हें ?"

"त्यांचीच तर ही कल्पना ! शिक्षकांना आठ आणे वर्गणी आहे. पण आमचे गुरुजी वर्गासाठीं मुद्दाम जास्त वर्गणी देणार आहेत. ते तर म्हणाले कीं, तुम्हांला पण शाळेंत बोलावलें आहे."

"होय तर ! आम्ही सारे मित्र येणारच आहोंत शाळेंत त्या दिवशीं. संपत पाटील मुद्दाम काल सांगायला आले नव्हते का आपल्या घरीं ? उद्यां घेऊन जा बरें का आठ आणे."

* * *

दुसऱ्या दिवशीं मुलें वर्गणी घेऊन आलीं. प्रत्येक वर्गशिक्षकाजवळ त्या त्या वर्गाची वर्गणी जमा झाली.

शाळा सुटल्यावर स्वराज्य-सभेच्या मंत्रिमंडळाची बैठक होणार होती. प्रत्येक मंत्र्यानें आपापल्या कल्पनेप्रमाणें कार्यक्रम तयार केला होता.

ठरलेल्या वेळीं सभा सुरू झाली. मुख्याध्यापक, सल्लागार शिक्षक व सर्व मंत्री उपस्थित होते.

" वाच पाहूं तुझा कार्यक्रम, हरी. " मुख्याध्यापक मुख्य मंत्र्याला म्हणाले. " हा आपण कच्चा खर्डा समजूं. इतरांना सुचतील ते बदल त्यांनीं सुचवावे. "

हरीनें कार्यक्रम वाचून दाखविला—

| | | |
|---|---|---|
| सायंकाळीं | ४ ते ७ | —प्रदर्शनाचें उद्‌घाटन; प्रदर्शन पाहणें, दाखविणें वगैरे. |
| रात्रीं | ७ ते ८ | —काव्यगायनाच्या चढाओढी. |
| ,, | ८ ते ९ | —खेळांचे सामने; कांहीं प्रात्यक्षिकें. |
| ,, | ९ ते १० | —दुग्धपान. शिक्षक, पालक यांनीं कोजागिरीचे अनुभव सांगणें किंवा माहिती देणें. |
| ,, | १० ते १०-३० | —सांघिक गाणीं. |
| ,, | १०-३० ते ११ | —मुख्याध्यापकांचें समारोपाचें भाषण; बक्षिसें वांटणें इत्यादि. |

" वा ! कार्यक्रम तर खरोखरच छान आहे ! " आरोग्यमंत्री कृष्णा म्हणाला.

" छान खरा; पण काम किती करायला लागेल ? दुधाची व्यवस्था करतां करतां नाकीं नऊ येतील. मग इतर कार्यक्रमांची व्यवस्था कशी करणार ? " मुख्याध्यापक म्हणाले.

" त्याची नको काळजी. सारी व्यवस्था होईल. आमच्या कामावर देखरेख करायला देशमुख गुरुजी मात्र द्या. निरनिराळीं खातीं पाडूं व एकेकाकडे तीं आपण वांटून देऊं. " हरी म्हणाला.

" होय, असेंच करावें; म्हणजे कामेंहि लवकर आटोपतील. ' दुग्धपान ' खातें मी पाहीन. " गणू म्हणाला.

" खेळ व सामने माझ्याकडे द्या. माझें स्वयंसेवक-पथक हीं कामें करायला तयारच आहे." बलदेवानें सुचविलें.

" मी 'प्रदर्शन' खातें घेतें. दोन दिवसांत सारी तयारी करून घेईन."

अशा सर्व खात्यांचीं कामें वांटलीं गेलीं. सर्व खात्यांचा खर्च कसा करावा याची पण चर्चा झाली. मुलांची वर्गणी, शाळेची देणगी, शिक्षकांची व पालकांची वर्गणी किती जमा झाली हें मुख्याध्यापकांनीं सांगितलें. थोडक्यांत सांगायचें म्हणजे सारी पूर्वतयारी झाली व मुलें आपापल्या कामाला लागलीं.

*

कोजागिरीचा दिवस उजाडला. आज शाळा फक्त सकाळींच भरली. याचा अर्थ दुपारीं शाळा नव्हतीच असा नाहीं. दुपारीं इतर कामें खूप होतीं. क्रीडांगणें आंखणें, प्रदर्शन मांडणें, सभेची व्यवस्था करणें, बक्षिसें ठरविणें इत्यादि अनेक लहानमोठीं कामें होतीं. दीडशें—दोनशें मुलें त्यासाठीं धडपडत होतीं. आपापलें 'खातें' चांगलें ठरलें पाहिजे म्हणून मोठ्या कसोशीनें मुलें कामें करीत होतीं.

दुपारीं एक वाजतांच सर्व मंत्री आले. स्वयंसेवक आले. भराभर पण मोठ्या शिस्तीनें कामाला लागले. देशमुख गुरुजी मधून मधून आवश्यक त्या सूचना देत होते. साडे तीन वाजतां अगदीं सारी तयारी झाली होती.

- मुलांनीं तयार केलेल्या निवडक वस्तूंचें, चित्रांचें एक छोटेसें पण आकर्षक असें प्रदर्शन कमलनें मांडलें होतें.
- क्रीडांगणें आंखून, पाणी घालून तयार होतीं. जणूं तीं खेळायला बोलावीत होतीं.
- करमणुकीच्या कार्यक्रमाची पण सारी तयारी झाली होती.
- दूध आलें होतें. तें आटवावयाची व्यवस्था छान झाली होती.

बरोबर चार वाजतां कार्यक्रमास सुरुवात झाली. शेजारच्या गांवचे एक चित्रकार उद्घाटनासाठीं आले होते. त्यांनीं छोटेसें भाषण करून प्रदर्शनाचें उद्घाटन केलें. नंतर साऱ्यांनीं प्रदर्शन पाहिलें.

प्रदर्शनाची व्यवस्था पण सुरेख होती. प्रत्येक विभाग दाखविण्यासाठीं स्वतंत्र स्वयंसेवक होते. स्वागतासाठीं कमल प्रवेशद्वारींच उभी होती. प्रदर्शनांतली मांडणी, वस्तू, व्यवस्था पाहून अनेकांना आनंद झाला. कांहींनीं तो बोलून दाखविला; कांहींनीं तर प्रत्यक्ष बक्षिसें देऊन आपला आनंद व्यक्त केला. जवळ जवळ वीस-बावीस बक्षिसें पालकांनीं दिलीं.

खेळांचे सामने पण मजेदार झाले. सारेच खेळाडू चुरशीनें खेळले. कोणी शिस्त मोडली नाहीं. इयत्ता सातवी हुतुतूंत विजयी झाली. इयत्ता पांचवीनें आट्यापाट्यांत विजय मिळविला.

काव्यगायनाच्या चढाओढी झाल्या. कवितांची निवड मोठी छान होती. मुलांनीं त्या कविता म्हटल्याहि फार गोड! इयत्ता तिसरी व पांचवी या वर्गांनीं काव्यगायनांत बरींच बक्षिसें मिळविलीं.

दुग्धपानाच्या वेळीं खूप मौज आली. दुधाचा आस्वाद घेतां घेतां इतर बोलणेंहि सुरूच होतें. जमलेल्या शिक्षकांनीं व पालकांनीं आपले मजेमजेचे अनुभव सांगितले. त्यांच्या लहानपणीं दूध कसें भरपूर मिळत असे; अनेकांना मुद्दाम बोलावून दुग्धपानाचे कार्यक्रम कसे होत असत इत्यादि मजेदार पण बोधप्रद माहिती त्यांतून मिळाली. मुलांच्या मनांत सहज कल्पना आली—हल्लीं पण तशी स्थिति कां आणतां येऊं नये? प्रयत्न केला पाहिजे.

यानंतर मुलांचीं सांघिक गाणीं झालीं. त्यांत कांहीं पोवाडे व कूचगीतें होतीं. साऱ्या मुलांनीं एका आवाजांत म्हटलेलीं हीं गाणीं रात्रीच्या शान्त वेळीं फार गोड वाटलीं. तीं ऐकायला शाळेच्या आवारांत खूप लोक आपोआपच जमले.

नंतर सभेचें काम तेथेंच क्रीडांगणावर सुरू झालें. प्रथम चिटणिसानें अहवाल वाचला. बक्षिसें वांटलीं गेलीं. दोन-तीन पालकांनीं उत्तेजनपर भाषणें केलीं. शेवटीं मुख्याध्यापकांचें भाषण झालें. ते म्हणाले—

" आतां पावसाळा संपत आला. त्यानंतरचें हें चांदणें पहिलेंच; म्हणून त्याची मजा अधिक. आपण आज एकत्र आलों व मोठा मजेदार कार्यक्रम केला. मुलांनीं आपापलीं कामें छान केलीं. मला व आपल्या पाहुण्यांना खूप समाधान वाटलें. असेंच वारंवार एकत्र येत जा. आपल्याला मोठमोठीं कामें करावयाचीं आहेत. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्यांतच खरी मौज आहे. आपल्या देशाचीहि त्यांतच खरा खरा फायदा आहे.

पांचवीचा वर्ग त्यांच्या एकजुटीमुळें किती पुढें आहे पहा. प्रदर्शनांत त्या वर्गाला निम्मीं बक्षिसें मिळालीं आहेत. आट्यापाट्यांत तो वर्ग पहिला. काव्यगायनांत पण त्यांनीं बक्षिसें मिळविलीं आहेत. पण सर्वांत कौतुकाची गोष्ट म्हणजे त्यांचा सबंध वर्ग आज येथें हजर आहे. त्यांच्या वर्गांत गरीब मुलें आहेतच; पण इतरांनीं त्यांची वर्गणी भरली. सुखाच्या, मौजेच्या वेळीं त्यांनीं सार्‍यांना एकत्र आणलें. हा वर्ग खरा पुढें. तुम्हीं सर्वांनींच याचा विचार करावा व आपल्या वर्तनांत सुधारणा करावी. तुम्हां सर्वांना माझा आशीर्वाद.

तुमचे पालकहि आज या समारंभाला आले. त्यांनीं मोकळ्या मनानें, आपुलकीनें भाग घेतला. मुलांच्या कार्याकडे कौतुकानें पाहिलें व त्यांच्या कार्याचा त्यांनीं गौरव केला. त्यांचा पण मी फार फार आभारी आहे. असेंच आपण एकत्र येत गेलों व चांगले चांगले कार्यक्रम हातीं घेऊन पार पाडूं लागलों तर आपला देश उत्तमच राहील. सर्वांना परमेश्वर ही बुद्धि देवो ! "

' राष्ट्रगीत ' झालें व कार्यक्रम संपला.

## अभ्यास

( १ ) कार्यक्रमांत कोणकोणत्या गोष्टींचा समावेश केला होता ? कां ?

( २ ) कार्यक्रमाची तयारी कोणी केली ? कोणत्या प्रकारें ? ती चांगली होती का ? कशावरून ?

( ३ ) पालकांनीं कोणते अनुभव सांगितले ? त्यामुळें मुलांच्या मनांत कोणती कल्पना आली ? ती कल्पना कशी खरी करून दाखवितां येईल ?

( ४ ) इयत्ता पांचवीचा वर्ग सर्वांच्या पुढें कसा ?

( ५ ) तुम्ही मुख्याध्यापक आहांत असें समजा व एक छोटेंसें भाषण तयार करा.

( ६ ) सुखद, केंद्रस्थान, सल्लागार, प्रात्यक्षिकें, नाकीं नऊ येणें, उद्घाटन, आकर्षक, प्रवेशद्वार, उत्तेजनपर, एकजूट यांचा अर्थ सांगा व वाक्यांत उपयोग करून दाखवा.

( ७ ) 'आमची कोजागिरी' वर्णन करणारें एक छोटेंसें पत्र तुमच्या मित्राला लिहा.




म. ग्रं. सं. ठाणे. [illegible]
वा. क्र. ...3269 नों. दि. ..
वि. .....

# ३

# महात्माजींच्या पुण्यस्मृतीसाठीं



आमच्या शाळेंत मुलांना सूचना देण्याची पद्धत जरा निराळीच होती. आमचे मुख्याध्यापक एका फलकावर सूचना देत. तेथूनच साऱ्यांनीं सूचना वाचाव्या. मौज अशी कीं, मुलांनाहि तशीच सवय लागली होती. एकदां फलकावर खालीलप्रमाणें सूचना होती:—

मुलांनो,

आपल्या भारतांतील अतिशय वंद्य अशा आपल्या महात्माजींच्या स्मृतीनिमित्त आपल्याला पुढचा सप्ताह ( दि. २६–९ ते २–१० ) पाळावयाचा आहे. स्वराज्य-सभा हा कार्यक्रम ठरवीलच; परंतु तुम्ही पण त्यांना सूचना करा. महात्मा गांधींच्या आवडत्या कार्यांना प्रथम स्थान द्या.

ही सूचना मला मोठी मजेची वाटली. महात्माजींसारख्या मोठ्या माणसाची स्मृति कशी साजरी करावी हें आम्ही मुलें कसें ठरविणार? पण माझी शंका लवकरच फिटली. कारण त्याच दिवशीं सांघिक कवाइतीच्या वेळीं मुख्याध्यापकांनीं भाषण करून कार्यक्रमाची कल्पना दिली. ते म्हणाले—

"महात्माजींच्या निरनिराळ्या कार्यांची माहिती देणारीं पुस्तकें, चित्रें, तक्ते वाचनालयांत मुद्दाम ठेविले आहेत, ते पहावे व त्यावरून आपला कार्यक्रम ठरवावा."

स्वराज्य-सभेच्या सभासदांनीं व इतर मुलांनींहि वाचनालयांत जाऊन माहिती मिळविली. 'सूचना' पेटींत सूचना टाकण्यासाठीं अनेकांनीं तयारी केली.

दुसऱ्या दिवशीं पेटी सूचनांच्या कागदांनीं भरली होती. स्वराज्य-सभेच्या चिटणिसानें त्या साऱ्या सूचना काढल्या. एक एक वाचून त्यांची त्यानें वर्गवारी करून ठेवली.

* * *

दुपारीं दोनच्या सुमारास स्वराज्य-सभेचे सारे सामान्य सभासद एकत्र आले. देशमुख गुरुजीपण आले होते. चिटणिसांनीं प्रास्ताविक भाषण केलें व आजचें कार्य कोणतें आहे हें सांगितलें. आलेल्या सूचना वाचून दाखविल्या. "सभासदांनीं पुढें यावें व त्यांच्या कल्पनेप्रमाणें कार्यक्रमाचा आराखडा सभेपुढें मांडावा." चिटणिसानें विनंती केली.

बसंत डहाळे पुढें आला व म्हणाला, "या सप्ताहांत आपण कोणकोणतीं कामें करावीं हें प्रथम ठरवूं. सविस्तर कार्यक्रम आपल्या स्वराज्य-सभेचें मंत्रि-मंडळ ठरवील. महात्माजींच्या कार्यक्रमांत कताई, सफाई, प्रार्थना, प्रवचन, हरिजन-सेवा यांना मुख्य स्थान आहे. यांचा आपण कार्यक्रमांत समावेश करावा."

रामू भोसले म्हणाला, "मला हा कार्यक्रम पसंत आहे. पण शाळेंतील अभ्यास या सप्ताहांत बंदच ठेवावयाचा कीं काय, याचा अगोदर विचार करा."

" रोजचा अभ्यास बंद कसा ठेवतां येईल ? या सप्ताहाच्या खास कार्यक्रमासाठीं रोज दोन तास मुद्दाम वेळ दिला जाईल. " गुरुजींनीं खुलासा केला.

" म्हणजे रोज चार तास ठराविक अभ्यासाचे होणार. ते भाषा, इतिहास, भूगोल, शास्त्र, चित्रकला, हस्तव्यवसाय यांचेच ठेवावे म्हणजे कार्यक्रमाला त्यांची जोड मिळेल. " मधूनें पुष्टी जोडली.

" ती कशी काय ? " कमलनें शंका विचारली.

" कविता, गद्य, निबंध—सारें महात्माजींबद्दल घ्यायचे. स्वातंत्र्याच्या इतिहासाचा अभ्यास करावयाचा. आपल्या देशाची अधिक माहिती मिळवावयाची. चित्रें काढायचीं तीं पण अशींच या दृष्टीनें." कुसुमनें खुलासा केला.

अशा बऱ्याच सूचना आल्या. इतक्या कीं, सर्व सूचनांचा विचार साऱ्यांनीं एकत्र बसून करणेंच कठीण झालें. म्हणून गुरुजींनीं सांगितलें कीं, पांच सभासदांनीं एक कार्यक्रम निश्चित करून आणावा व सभेपुढें मांडावा. त्यासाठीं आतां अर्धा तास सभा बंद राहील.

निवडलेल्या पांच सभासदांखेरीज सारे सभासद बाहेर गेले. पांच सभासदांनीं गुरुजींच्या मदतीनें कार्यक्रमाचा आराखडा आंखला तो असाः—

दि. २६–९ —प्रभातफेरी, झेंडावंदन, सप्ताहाचें उद्‌घाटन, सफाई, प्रवचन, कताई.

दि. २७–९ —कताई, प्रवचन. सफाई, सायंफेरी.

दि. २८–९ —सफाई, हस्तव्यवसाय— गटागटानें कताई, विणकाम, कातरकाम, चित्रकला, बुरूडकाम.

दि. २९–९ —वर्गांचीं हस्तलिखितें तयार करणें, सफाई.

दि. ३०–९ —वर्गांचीं हस्तलिखितें तयार करणें, सफाई.

दि. १–१० —सफाई, कताई, प्रवचन, सहभोजन.

दि. ३–९ —प्रभातफेरी, सफाई, महात्मा गांधी-दर्शनाचें प्रदर्शन, सप्ताहाचा समारोप.

अशा प्रकारचा एक आराखडा तयार झाला. तो सर्व सभासदांपुढें मांडून मंजूर करून घेण्यांत आला. सविस्तर कार्यक्रम तयार करण्याचें व तो अमलांत

आणण्याचें काम मंत्रिमंडळाकडे सोंपविण्यांत आलें. मंत्रिमंडळाला मदत करण्यासाठीं खालील प्रमाणें समित्या मात्र तेथेंच ठरविण्यांत आल्या:—

सफाई-समिति, हस्तव्यवसाय-समिति, प्रवचन वगैरे कार्यक्रम-समिति, 'हस्तलिखितें' तयार करणारी समिति, सभासमिति.

प्रत्येक समितीचें कार्यहि ठरविण्यांत आलें व नंतर सभा बरखास्त झाली.

स्वराज्यसभेच्या मंत्रिमंडळानें अगदीं बारीकसारीक गोष्टींचा विचार करून कार्यक्रम आंखला होता. रोजच्या कार्यक्रमांत सफाई, कताई, प्रार्थना यांना स्थान देण्यांत आलें होतें. याशिवाय—

- इयत्ता पहिली ते सातवीसाठीं गद्य व पद्य उताऱ्यांची निवड करून देण्यांत आली होती.
- बापूजींच्या चरित्रांतील उत्तम उत्तम गोष्टी सांगण्याचा कार्यक्रम प्रत्येक वर्गासाठीं ठेवला होता.
- प्रभात व सायंफेरीसाठीं कूचगीतें, ध्येयगीतें निवडलीं होतीं. तीं सांगण्यासाठीं मुलांची योजनाहि अगोदरच करून ठेवली होती.
- प्रार्थनेनंतरच्या प्रवचनांचे विषय त्या त्या दिवशीं होणाऱ्या कार्यक्रमांवरच आधारले होते. प्रवचनांचे विषय असे होते—सफाई कशासाठीं? वस्त्रस्वावलंबनच कां? आपण सारे भाऊ-भाऊ, प्रार्थना म्हणजे देवाजवळ जाणें, स्वदेशी धर्म, बापूजींची जगाला मोठी देणगी.
- हस्तलिखितांसाठीं विषय निवडून देण्यांत आले होते. त्यासाठीं हातकागदाची मुद्दाम निवड केली होती.
- सफाईचें पुरेसें साहित्य आणलें होतें. रोज सफाई कोठें व किती वेळ करावयाची हें निश्चित केलें होतें.

थोडक्यांत सांगायचें म्हणजे वर्गांत आवारांत व गांवांत मुलांनीं कोणकोणतीं कामें करावयाचीं हें नीट विचार करून ठरविलें होतें.

प्रत्येक समितीनें आपापलें कार्य फार कसोशीनें केलें. आपल्या चुकीमुळें कार्यक्रमांत वाईटपणा येऊं नये; महात्माजींच्या स्मृतीचा अपमान होऊं नये.

म्हणून समित्यांचे सभासद स्वतः होऊनच पुष्कळशीं कामें करीत होते. साऱ्या कामावर देखरेखहि सभासदच करीत होते.

*   *   *

सप्ताहाचा पहिला दिवस फारच उत्साहानें पण गंभीरतेनें साजरा झाला. जवळ जवळ सारीं मुलें प्रभात-फेरीला हजर होतीं. यशवंत आपल्या खड्या आवाजांत कूचगीत सांगत होता. फेरीचें दृश्यहि मोठें सुरेख होतें. साऱ्या मुलांनीं गांधी टोप्या घातल्या होत्या. चाराचारांच्या रांगा करून मुलें ऐटींत चालत होतीं.

प्रभातफेरीनंतर ठरल्याप्रमाणें सारा कार्यक्रम अगदीं वेळेवर पार पडला.

दुपारीं शाळेंत गेल्यावर पाहिलें तों काय !—सारें वातावरणच गांधीमय.

● शाळेच्या पायऱ्या चढल्याबरोबर समोरच महात्मा गांधीजींचें एक मोठें चित्र ठेवलें होतें. चित्र पाहून असें वाटे कीं, महात्माजी खरोखरच आपल्या समोर प्रत्यक्ष सूत कांतीत आहेत. आमच्या चित्रकलेच्या गुरुजींनीं हें चित्र काढलें होतें.

● बाहेरच्या फलकांवर मुख्याध्यापकांनीं, इतर गुरुजींनीं महात्माजींवरच छोटे छोटे लेख लिहिले होते.

● वाचनालयांत तर महात्माजींचीं वचनें, चित्रें, लेख असें भरपूर साहित्य नीट लावून ठेविलें होतें.

● पहिल्या तासाला महात्माजींवरच्या कविता निरनिराळ्या वर्गांत शिकविण्यांत आल्या. दुसऱ्या तासाला 'गीताई'मधील कांहीं ओंव्या वाचून घेतल्या व गुरुजींनीं त्या समजावून सांगितल्या. तिसऱ्या तासाला इतिहासाचे शिक्षक आले होते. सर्व वर्गांत सारखेच तास होते. या तासाला १९२० पासून १९३० पर्यंतचा हिंदुस्थान कसा होता हें सांगण्यांत आलें. चवथ्या तासाला वर्ग-सफाईची माहिती देण्यांत आली व त्यानंतरच्या तासांना वर्गांची सफाई केली गेली.

*   *   *

अशा रीतीनें पहिल्या दिवसापासून शेवटल्या दिवसापर्यंत सारीं कामें अगदीं घड्याळाप्रमाणें पार पडलीं. प्रत्येक समितीनें आपापल्या कार्याचा

छोटासा अहवाल तयार केला होता. नमुन्यासाठीं खालीं कांहीं अहवाल दिले आहेत. याप्रकारें काम करणें म्हणजेच खरें महात्माजींचें स्मरण करणें आहे.

## ‘ सफाई ’ समिति

या सप्ताहांत ‘ सफाई ’ला रोजच स्थान देण्यांत आलें होतें. पण ‘ सफाई ’ म्हणजे नुसती झाडझूड असें स्वरूप ठेवलें नव्हतें. वर्ग, घरें, वसतिगृह यांची संपूर्ण स्वच्छता; संडास, मुताऱ्या यांची सफाई; चराचे संडास तयार करणें; एक रस्ता साफ करणें व दुरुस्त करणें; आपापल्या कपड्यांची स्वच्छता; वर्ग नीट सुशोभित करणें इत्यादि गोष्टींचा कार्यक्रमांत समावेश करण्यांत आला होता.

या कार्यक्रमांत भाग घेणें कांहीं मुलांना आरंभीं जड गेलें. पण एक-दोन दिवसांतच त्यांच्या मनांतले वाईट विचार नष्ट झाले व तीं सारीं मुलें कामाला लागलीं. सर्वांत उत्कृष्ट कार्य इयत्ता ५ वीच्या मुलांनीं केलें. त्यांच्या वर्गांतल्या प्रत्येक मुलाची वैयक्तिक स्वच्छता वाखाणण्यासारखी होती. सांघिक कार्य तर सुरेखच. सर्व मुलें वेळेवर हजर होत; ठरलेलें काम उत्कृष्टपणें अगदीं ठरलेल्या वेळेंत करीत व इतर कार्यक्रमांनाहि हजर राहात.

‘ सफाई ’चें बक्षीस त्यांना मिळालें हें योग्यच झालें. रस्त्याची सफाई केल्यावर तेथें घाण होऊं नये म्हणून त्यांच्या वर्गानें केलेलें निरोधन हा त्यांचा खास कार्यक्रम होता. त्याबद्दल त्यांचें सर्वांनीच कौतुक केलें. त्या भागांतील नागरिकांनीं पण त्यांना नंतर फार चांगल्या रीतीनें वागविलें.

महात्माजींच्या पुण्य स्मृतीनें आपणां सर्वांना स्वच्छतेच्या व स्वावलंबी-पणाच्या संवयी लागोत !

## ‘ कताई ’—समिति

या सप्ताहांत सांघिक सूत-कताईसाठीं रोज एक तास देण्यांत आला होता. याशिवाय प्रत्येक वर्गानें जादा पेळू मागितल्यास दिले होते.

या सप्ताहाच्या शेवटीं इ. ५ ते ७ पर्यंतच्या मुलांनीं निदान प्रत्येक वर्गातर्फें साठ गुंड्या द्याव्यात असें ठरलें होतें. अधिकांत अधिक गुंड्या काढील त्या वर्गाला बक्षीस ठेवण्यांत आलें होतें.

सांगायला मोठा आनंद वाटतो कीं, एकूण अपेक्षेपेक्षां बरेंच जास्त सूत तयार झालें. इ. ७ वी नेंच ११० गुंड्या सूत दिलें. इ. ३ व ४ या वर्गांनीं पण प्रत्येकीं २० गुंड्या सूत दिलें. अशा एकूण ३०० गुंड्या सूत तयार झालें. त्याचें कापड विणून आपल्या सहकारी दुकानांत विक्रीला ठेवण्यांत येणार आहे. या कापडाला महात्माजींच्या पुण्य स्मृतीचा सुवास आहे. सर्वांनाच थोडें थोडें कापड मिळेल असें आपण करूं.

या आंकड्यावरून एक गोष्ट ध्यानीं येईल कीं, आपण जर रोज एक दोन तास सूत कांतलें तर आपण वस्त्रस्वावलंबी सहज होऊं शकूं.

या पवित्र सप्ताहामुळें आपणां सार्‍यांनाच तशी बुद्धि होवो !

## 'नियतकालिक'-समिति

आपल्या शाळेंतील सर्व मुलांची विभागणी आठ गटांत केली असल्याचें माहीत आहेच. प्रत्येक गटांत इ. १ ली ते ७ वीपर्यंतचीं मुलें सारख्या प्रमाणांत वांटलीं आहेत. प्रत्येक गटानें आपापल्या गटाचें एक हस्तलिखित नियतकालिक तयार करून समितीकडे पाठवावें असें जाहीर केलें होतें.

या अंकांत सारें लेखन, चित्रें वगैरे महात्माजींबद्दलच असावीं अशी सूचना देण्यांत आली होती. पहिल्या दोन अंकांना बक्षिसें देण्याचें ठरलें होतें. त्यासाठीं एक परीक्षक-समिति नेमली होती. त्या समितीनें आपलें कार्य उत्तम प्रकारें केल्याबद्दल मी शाळेतर्फे त्यांचें आभार मानतों.

पहिलें बक्षीस 'समर्थ' गटानें मिळविलें आहे. त्यांनीं तयार केलेला अंक मोठा तर आहेच, पण सारें लेखन शुद्ध आहे हें विशेष. अक्षरहि सुरेख आहे. टापटीप पाना-पानावर दिसते. गांधीजींचीं जीवन-चित्रें बाल-चित्रकार शरद मराठे यानें काढलीं आहेत. दुसरें बक्षीस महात्मा गांधी-गटानें मिळविलें आहे. त्यांच्या अंकांत पहिल्या अंकाइतकी विविधता नाहीं, पण अंकाची मांडणी—संपादकीयापासून तों निरोपापर्यंत—फार सुरेख व विचारपूर्वक केली आहे. लेखनहि शुद्ध आहे.

दोन्ही गटांचें खास अभिनंदन ! इतर गटांतील लेखकांचें व कवींचेंहि मीं आभार मानतों. महात्माजींचें वर्णन करणार्‍या यांच्या लेखण्या धन्य होत !

या सप्ताहानें मुलांना अनेक गोष्टी शिकविल्या. आपण जगावें कसें व कशासाठीं याचें हें प्रत्यक्ष शिक्षणच. याचा विसर पडणेंच अशक्य.

## अभ्यास

( १ ) महात्मा गांधींचा स्मृतिसप्ताह केव्हां येतो ? या सप्ताहांत कोणकोणते कार्यक्रम करावेत ? कां ?

( २ ) कार्यक्रमाचा आराखडा कोणीं तयार केला ? त्यासाठीं इतरांनीं कोणत्या प्रकारें मदत केली ?

( ३ ) या कार्यक्रमांतून तुम्हांला कोणकोणते संदेश मिळतात ? त्यांचा अर्थ काय ? तुम्ही ते कसे अमलांत आणणार ?

( ४ ) तुमच्या शाळेंत कोणकोणते कार्यक्रम करतात ? एकाद्या कार्यक्रमाचा अहवाल तयार करा.


( ५ ) वंद्य, स्मृति, प्रास्ताविक, सभेपुढें मांडणें, आराखडा, हस्तलिखित, ध्येयगीत, कूचगीत, वैयक्तिक, नियतकालिक, विविधता निरोधन या शब्दांचा अर्थ सांगा व वाक्यांत उपयोग करा.

( ६ ) श्री. साने गुरुजींचें 'गोष्टीरूप गांधीजी' व श्री. आपटे गुरुजींचें 'गांधींची गोष्ट' हीं पुस्तकें वाचा.



# ४

# एकमेकां साह्य करूं



दिवाळीचे दिवस होते. घरोघर सण साजरा होत होता. भाऊबिजेसाठीं संपतराव मुद्दाम रामपूरला आले होते. संपतरावांचे मेहुणे नारायणराव हे शेतकी खात्यांत नौकर होते. त्यांना बरोबर घेऊन बाजारांत जावें व भाचा, भाची व बहीण यांचेसाठीं कांहीं वस्तू खरेदी कराव्या असें त्यांच्या मनांत आलें. दुपारीं चार वाजायच्या सुमारास ते नारायणरावांना म्हणाले—

" नारायणराव, बाजारांत चलतां का जरा ? ताई, गणू व कमू यांच्या-साठीं कांहीं खरेदी करूं या. "

गणू तेथेंच होता. तो मामांना म्हणाला, " आपण दोघे जाऊं बाजारांत. आमच्या दुकानांत किती तरी नवीन नवीन वस्तू आल्या आहेत. मोठ्या छान आहेत त्या वस्तू. त्यांतल्याच आणूं आपण कांहीं. चलतां आमच्या दुकानांत ? "

" तुमचें दुकान ? " संपतरावांनीं आश्चर्यानें विचारलें. " तुम्हीं कधीं दुकान काढलें ? "

" होय ! आमचें दुकान. आमच्या शाळेचें दुकान. तुम्ही चला तर खरें." गणू म्हणाला.

" बरें; चला जाऊं या आपण. नारायणराव, आम्ही जाऊन येतों बाजारांत." मामा म्हणाले.

* * *

मामा, गणू व कमू अशीं तिघें बाजारांत गेलीं. दुकानावर जावयाची गणूला व कमूला किती घाई झाली होती. तेथील खेळणीं, पुस्तकें, चित्रें— सारें सारें जणूं त्यांच्या डोळ्यांसमोर होतें. तीं तिघें लवकरच शाळेंतल्या ' सहकारी दुकाना ' जवळ येऊन पोहोंचलीं.

" हें आमचें दुकान. आम्हीं मुलेंच हें दुकान चालवितों. अन् ते दाराशीं उभे आहेत ना; ते आमचे गुरुजी. तेच आम्हांला वेळोवेळीं सल्ला देतात व मार्गदर्शन करतात. रोज एकदां तरी ते दुकानांत येऊन जातात." गणूनें माहिती सांगितली.

तीं तिघें दुकानांत शिरल्याबरोबर सदू गांवकरानें त्यांचें स्वागत केलें.

" या. काय हवें आपल्याला ? अन् आपण आमच्या गणूचे पाहुणे ना ? " सदूनें विचारलें.

" हे माझे मामा. मला, कमूला व आईला दिवाळीची भेट देण्यासाठीं यांना कांहीं वस्तू घ्यावयाच्या आहेत. " गणूनें सांगितलें.

" राजाराम, यांना आपण भेटीसाठीं काढून ठेवलेल्या वस्तू दाखव बरें." सदूनें राजारामाला—' भेटी ' विभागाच्या विक्रेत्याला—सांगितलें.

राजारामानें भराभर साऱ्या वस्तू त्यांना दाखवावयास सुरुवात केली.

" गणू, कमू तुम्हांला काय पाहिजे यांतलें ? " मामांनीं विचारलें.

" ही खेळाची पेटी छान आहे. आम्हां दोघांनाहि उपयोगीं होईल. पेटीचें नांवच किती मजेदार आहे—' बहीण-भाऊ पेटी ! ' दोघांच्या खेळाचें सामान आहे तींत. " कमूनें आपली मागणी सांगितली.

" खेळांच्या जोडीला निदान दोन तीन पुस्तकें पण द्या मामा." गणूनें सुचविलें.

मामांनीं एक खेळांची पेटी व चार-पांच पुस्तकें निवडलीं. बहिणीसाठीं-विणकामाचें साहित्य निवडलें.

" या खेळांच्या पेटीची किंमत किती ? " संपतरावांनीं विचारलें.

" अवघी साडे तीन रुपये. " राजारामानें चटकन उत्तर दिलें.

" पेटी तर चांगली दिसते; अन् त्या मानानें किंमतहि कांहीं फार नाहीं. कांहीं दोष तर नाहीं ना या पेटींत ? " मामांनीं विचारलें.

गुरुजी हें सारें बाहेर उभे राहून ऐकत होते. ते पुढें झाले व म्हणाले, " तुम्हांला तशी शंका येणें साहजिक आहे. पेटी चांगली आहे; आपण निवडहि चांगली केली आहे. इतर दुकानांत अशीच पेटी या किंमतींत मिळणार नाहीं हें पण खरें आहे. "

" असें कां ? तुमच्या दुकानाला फायदा नको कीं काय ? " मामांनीं विचारलें.

" वा ! फायदा पाहिजे तर ! पण वाटेल तसा फायदा आम्ही घेत नाहीं. रुपयाला एक आणा—या प्रमाणांत आम्ही फायदा घेतों. " सदूनें सांगितलें.

" पण यांतून तुमचा खर्च कसा भागणार ? " मामांनीं शंका काढली.

" त्यांचें असें आहे पहा—आमच्या या स्वयंसेवकांना पगार नाहीं. आमच्या दुकानाचें भांडवल हेंपण कोणा एकाच माणसाचें नाहीं. साऱ्या मुलांनीं एक एक रुपयाचा भाग खरेदी करून तें उभारलें आहे. मुलें पाळीपाळीनें काम करतात. " गुरुजींनीं सांगितलें.

" बरोबर आहे. विनावेतन नोकरी व सचोटीचे हिशेब यांमुळेंच दुकानाचा पैसा किती तरी बचत होत असेल ! त्याशिवाय दुकानाबद्दल आपुलकी पण आहे. गणूनेंच नाहीं का मला येथें खेंचून आणलें ! " मामा म्हणाले.

अनुक्रम २३
विभाग

"होय आमच्या मुख्याध्यापकांचा तर तो मोठा भक्त आहे. ते म्हणतात कीं 'सहकारी दुकान' हें प्रत्येकाला आपलेंच दुकान आहे असें वाटलें पाहिजे." सदू म्हणाला.

"वा छान ! दुकानाची व्यवस्था सुरेख आहे, पण यामुळें मुलांचा अभ्यास नाहीं का बुडणार ?" संपतरावांनीं शंका विचारली.

"आपण अगोदर खरेदी करून घ्या. बाहेरच्या कचेरींत आमचे गुरुजी वा सदू आपल्याला आणखी माहिती देतील." राजारामानें सुचविलें.

संपतरावांनीं त्या तिन्ही भेटी बांधून देण्यास सांगितलें. पेटी, पुस्तकें, विणकामाचें साहित्य अगोदरच राजारामानें बाजूस काढून ठेवलें होतें. चटपट त्या वस्तू त्यानें बांधून दिल्या व बिलहि करून दिलें.

त्या वस्तू घेऊन व बिल चुकतें करून संपतराव गुरुजींबरोबर बाहेरच्या खोलींत आले. तेथें ठेवलेल्या बांकावर ते दोघे बसले.

"हं. आपण सारें सांगाल का मला या आपल्या दुकानासंबंधीं ?" संपतरावांनीं गुरुजींना विचारलें.

"सदू, यांना आपल्या दुकानाची माहिती देतोस ना ?" गुरुजींनीं सदूला विचारलें.

सदू म्हणाला, "या दुकानांत आम्हांला फार तर एक तास काम पडतें. त्यामुळें आम्हांला बाजाराची माहिती होते. हिशेब ठेवतां येतात. सहकार्य कसें करावें, येणारा-जाणारांशीं कसें बोलावें हें कळतें. अनेकांशीं मित्रत्व जोडतां येतें. यासाठीं रोज एक तास गेला तर आमचें का नुकसान होईल ?"

"छे, छे ! या तर फार आवश्यक अशाच गोष्टी आहेत ! यामुळें कसलें नुकसान होणार !"

"शिवाय दुकानावर मालकी सर्वांचीच. सर्वांतर्फेच आम्ही चिटणिस निवडतों. या वर्षीं सदू गांवकर हा चिटणिस आहे. शाळेचे मुख्याध्यापक हेच आमचे अध्यक्ष असतात. एक शिक्षक उपाध्यक्ष असतात. विक्रेते सुद्धां निवडले जातात. यामुळें खऱ्या खऱ्या काम करणारांना योग्य संधि दिली

जाते. यांतूनच आपलें खरें सहकार्य देणारे नागरिक तयार होतील असें नाहीं वाटत तुम्हांला ? " गुरुजींनीं विचारलें.

" होतीलच. पण संधि मिळाल्यावर त्यांना योग्य मार्गदर्शन करायला आपणांसारखे सुस्वभावी, उद्योगी गुरुजी मिळाले पाहिजेत ना ! "

" त्यांत कांहीं विशेष नाहीं; पालकांनींच आतां अशा प्रकारच्या शिक्षणासाठीं तयारी ठेवली पाहिजे. या दुकानाचें काम, शाळेच्या ग्रंथालयाचें काम हेंपण महत्त्वाचें शिक्षण आहे हें त्यांना पटलें पाहिजे."

" मी तर साऱ्यांना अवश्य सांगेन. आमचा गाव लहान आहे; पण तेथेंहि याचा प्रयोग अवश्य करून पाहूं. आपण मात्र आम्हांला मदत करा. बरें येतों; नमस्कार.

" ठीक. या; नमस्कार. दुकानाबरोबरच आमच्या शाळेची पण आठवण ठेवा "

* * *

मामा, गणू व कमू घरीं यायला निघाले. गणूला तर आतां त्यांच्या दुकानाचा फारच अभिमान वाटत होता. त्यानें मामांना विचारलें, " मामा कसें आहे आमचें दुकान ? "

" सुरेख आहे. येथें आल्यावर आतां याच दुकानांतून माल घेत जाणार. तूं पण दुकानांत काम करायला शिकायला पाहिजे. खरें खरें सहकारी दुकान आहे तुमचें. भांडवल, काम, नफा या साऱ्या साऱ्या बाबतींत तुम्ही तुमच्या वर्तनानेंच दाखवितां कीं—"

" एकमेकां साह्य करूं अवघे धरूं सुपंथ."

## अभ्यास

( १ ) ' सहकारी ' दुकान कोणाचें होतें ? त्याला ' सहकारी ' कां म्हणायचें ?

( २ ) दुकानाबद्दल मामांना कोणकोणती माहिती मिळाली ? त्याबद्दल मामांच्या मनांत कोणकोणत्या शंका आल्या ? त्यांच्या शंकांना कोणी व कोणतीं उत्तरें दिलीं ?

( ३ ) मामांनीं गुरुजींना कोणतें आश्वासन दिलें ? कां ?

( ४ ) ' सहकारी ' दुकान चांगलें होतें हें कोणकोणत्या गोष्टीं-वरून सिद्ध कराल ?

( ५ ) " आम्ही दिवाळी कशी साजरी केली ? " यावर २० ते २५ ओळींचें मित्रास पत्र लिहा.

( ६ ) ' माझें वाचनालय ' यावर २०–२५ ओळी लिहा.

( ७ ) मार्गदर्शन, विक्रेता, साहाजिक, आपुलकी, सुस्वभावी, आवश्यक या शब्दांचा अर्थ सांगा व त्यांचा वाक्यांत उपयोग करून दाखवा.



५

# मुलांच्या न्यायालयांत



उन्हाळ्याची सुटी संपून शाळा सुरू झाली होती. स्वराज्य-सभेच्या निवडणुकी झाल्या होत्या. या वर्षी कोणकोणतीं कामें स्वराज्यसभेनें करावीत हें मुख्याध्यापकांनीं पहिल्याच दिवशीं सांगितलें होतें. ते म्हणाले होते—

“ मागच्या वर्षीं आपण ‘ सहकारी ’ दुकानाचा एक प्रयोग केला. तुमच्या स्वराज्यसभेनें सुरेख काम केलें. मुलांनीं, गुरुजींनीं व पालकांनीं तुम्हांला धन्यवाद दिले. या वर्षीं आणखी एक नवा प्रयोग करणार आहोंत. तुमच्यापैकीं कांहीं मुलें कधीं कधीं चुका करतात. त्यांना शासन कोणतें द्यावें हें आतां तुम्ही ठरवावयाचें आहे. एक शिक्षक व तुमचे पांच प्रतिनिधी मिळून हें न्यायालय होईल. निवडणूकी झाल्यावर येणाऱ्या शनिवारीं आपण योजना आंखूं ”

तो शनिवार आज होता. साऱ्यांचें लक्ष या न्यायालयाच्या योजनेनें आकर्षून घेतलें होतें. शाळेच्या आवारांत, सुटीच्या वेळांत तुम्ही भटकला असतां तर खूप मजेदार शेरे ऐकायला मिळाले असते.

कोणी म्हणत, :" हीं पोरेंच आम्हांला शिक्षा देणार काय ? बाहेर आलीं कीं काढूं बडवून. "

कोणी म्हणत, " अशानें मुलें गुरुजींचें न ऐकतां या मुलांचेंच ऐकायला लागतील. अन् मग त्या गुरुजींचे हाल बघायलाच नकोत. "

कोणी म्हणत, " हें ठीक होईल. आपले मित्र न्यायालयासाठीं निवडून द्यावेत म्हणजे शिक्षा व्हायलाच नको. "

कोणी म्हणत, " अरे, या न्यायालयाच्या प्रतिनिधींना थोडीशी लांच दिली कीं झालें. मग कसली शिक्षा ! "

माझ्या कानांवर अशीं बोलणीं अनेक वेळां पडलीं होतीं. न्यायालयाचें काम किती कठीण आहे याची मात्र चांगली कल्पना आली. एकदां तर वाटलें कीं, सरळ मुख्याध्यापकांकडे जावें व सांगावें कीं, न्यायालय सुरूच करूं नका. पण मला मुख्याध्यापकांचा स्वभाव माहीत होता. एकदां ठरवलेली गोष्ट केल्याशिवाय ते रहायचे नाहींत.

* * *

शनिवारीं शाळा पांच तासच होती. तास संपल्यावर आम्ही सारे सभासद स्वराज्यमंदिरांत एकत्र आलों. सारे सभासद ठरलेल्या जागीं जाऊन बसले. निरनिराळ्या खात्यांचे सल्लागार गुरुजी पण उपस्थित होते. दोन-तीन मिनिटांतच मुख्याध्यापक आले. आम्ही सारे एकदम उभे राहिलों. त्यांना अभिवादन केलें. लगेच कार्याला सुरवात झाली. प्रथम मुख्याध्यापक बोलले. ते म्हणाले—

" या आपल्या नवीन न्यायालयाचे सल्लागार श्री. देशपांडे गुरुजी हे आहेत. ते आतां सारी माहिती तुम्हांला देतील."

नंतर श्री. देशपांडे गुरुजी म्हणाले, " मुलांनो, आपली शाळा आपणच सर्व प्रकारें चालवावी यासाठीं आपण प्रयत्न करीत आहोंत. मुलांनीं चुका-

करूं नये म्हणून आपण काळजी घेतो; पण त्यांच्या हातून चुका घडल्याशिवाय राहत नाहींत. या चुकांचा विचार करणें, चुका करणारांना योग्य मार्गाला लावणें हा आपल्या न्यायालयाचा उद्देश आहे. आपलें न्यायालय एकूण सहा सभासदांचें असेल. तुमच्यांतूनच पांच सभासद आपण निवडणार आहोंत. वर्गांचे कार्यवाह या न्यायालयासमोर आपापल्या वर्गांतील मुलांच्या चुका मांडतील. कार्यवाहांचें व आरोपी मुलांचें म्हणणें आपण ऐकायचें व नंतर नीट विचार करून निर्णय द्यायचा."

यानंतर पांच सभासदांची निवड झाली. निवडणुकीसाठीं प्रथम नऊ मुलें उभीं होतीं. नंतर त्या नऊ मुलांनीं एकत्र बसून पांचच मुलांचीं नांवें निश्चित केल्यामुळें निवडणूक करावीच लागली नाहीं. इतरांनीं या पांच सभासदांचें अभिनंदन केलें व त्यांना सर्व प्रकारें मदत करूं म्हणून आश्वासन दिलें. मुख्याध्यापकांनीं न्यायालयाचें उद्घाटन झाल्याचें सांगितलें. न्यायालयाच्या सभासदांनीं सभेपुढें येऊन शपथ घेतली. ही शपथ अशी होती—

**"आम्ही सारे सभासद सत्यानें वागूं; सहकार्यानें कार्य करूं; अन्याय होऊं देणार नाहीं. आमच्या कार्यानें आम्ही स्वराज्यसभेचा व आपल्या शाळेचा लौकिक वाढवूं."**

यानंतर मुख्याध्यापकांनीं आशीर्वादपर भाषण केलें. राष्ट्रगीत झालें व सभा संपली.

* * *

उद्घाटनानंतर बरोबर पंधरा दिवसांनीं न्यायालयाची बैठक भरणार होती. न्यायालयाच्या चिटणिसांकडे एकूण सहा तक्रारी आल्या होत्या. त्या अगाऊच जाहीर केल्या होत्या.

बैठकीचा दिवस उजाडला. शाळेंत जिकडे तिकडे मोठें उत्साहाचें वातावरण होतें. प्रत्येकाला या बैठकीचें कुतूहल वाटत होतें.

शाळा सुटल्यावर सारीं मुलें स्वराज्यमंदिरांत जमलीं. आजची पहिलीच बैठक असल्यामुळें इ. ५, ६, ७ या वर्गांतील साऱ्याच मुलांना प्रेक्षक म्हणून येण्यास परवानगी होती.

न्यायालयाची व्यवस्थाहि सुंदर केली होती. व्यासपीठावर एक खुर्ची, एक टेबल व पांच स्वतंत्र, एकेरी बाके ठेवलीं होतीं. प्रत्येक बांकावर कागद, पेन्सिली ठेवलेल्या दिसत होत्या. तेथेंच बाजूला दोन कोपऱ्यांत दोन बांकें ठेवलीं होतीं.

थोड्याच वेळांत सभासद, सल्लागार आले व आपापल्या जागांवर जाऊन बसले. चिटणिसांनीं कागदपत्र काढलें व पहिली तक्रार वाचून दाखविली—

**" इयत्ता सहावीमधील विद्यार्थी केशव देसाई हा वर्गातलें लेखी काम कधींच वेळेवर व व्यवस्थितपणें करीत नाहीं. इयत्ता सहावीच्या कार्यवाहानें आपली बाजू मांडावी."**

कार्यवाह व्यासपीठावर गेला व कोपऱ्यांत ठेवलेल्या बांकावर कागदपत्रें ठेवून आपलीं बाजू मांडूं लागला.—

" आमच्या वर्गाचे चार रचनापाठ झाले आहेत. सगळे विषय मिळून निदान पंधरा गृहपाठ झाले आहेत. केशव देसाई याला आम्ही, गुरुजींनीं वेळोवेळीं सूचना देऊनहि उपयोग झाला नाहीं. त्यानें एकच रचनापाठ लिहिला आहे. गृहपाठहि अवघे दोन केले आहेत. आमच्या वर्गाचें ' लेखन-कार्याचें ' बक्षीस केवळ केशवमुळें जात आहे. म्हणून मला असें मांडायचें कीं, केशवकडून खालील चुका झाल्या आहेतः—

गुरुजी, कार्यवाह यांच्या आज्ञा त्यानें पाळल्या नाहींत. शिवाय जें लेखन केलें तेंहि पुस्तकांवरून नकलून दिलें आहे. यामुळें त्यानें आपल्या वडिलांनाहि फसविण्याचा प्रयत्न केला आहे. वर्गाच्या एकीला, व्यवस्थितपणाला त्यानें मोठाच अडथळा आणला आहे. पुराव्यासाठीं त्याच्या सर्व वह्या येथें पाहण्यासाठीं आणल्या आहेत. निरनिराळ्या विषयांच्या शिक्षकांचीं त्याच्या लेखनकार्याबद्दल मतेंहि मी लिहून आणलीं आहेत. "

" केशव देसाई हजर आहे का ? त्याला आपली बाजू मांडावयाची असल्यास त्यानें येथें यावें व बाजू मांडावी." चिटणिस म्हणाला.

केशव देसाई व्यासपीठावर जाऊन आपल्या जागेवर जाऊन उभा राहिला.

" तुझ्यावर केलेला आरोप तुला मान्य आहे का ? " चिटणिसांनीं विचारलें.

" मी लेखन-कार्य केलें नाहीं हें खरें आहे. मला योग्य वाटेल ती शिक्षा द्यावी. मी पुन्हां असें होऊं देणार नाहीं. "

सभेंत एकदम टाळ्यांचा कडकडाट झाला. केशव देसाईला तर रडूंच कोसळलें. त्याला रडतांना पाहून सर्व्यांनाच आश्चर्य वाटलें. श्री. देशपांडे गुरुजी थोडे अस्वस्थ झाल्यासारखे दिसले. ते उभे राहिले व खड्या आवाजांत म्हणाले—

" मुलांनो, ही आतां आपली नेहमींची सभा नाहीं. हें न्यायालय आहे. येथें अगदीं पूर्ण शांतता ठेवली पाहिजे. वातावरण गंभीर पाहिजे. टाळ्यांचा कडकडाट येथें चालणार नाहीं. तुम्ही केवळ प्रेक्षक आहांत. न्यायदान कसें होतें हें तुम्हीं फक्त पाहायचें आहे. यानंतर ही शिस्त मोडूं नका. "

सभासदांकडे वळून ते म्हणाले, " आतां आपणांस केशव देसाई याला कोणतें शासन करावें हें ठरवावयाचें आहे. प्रत्येकानें आपला विचार मांडावा. नंतर आपण ठरवूं. "

" केशवास निदान एक रुपया दंड करावा. दंड मोठा असला तर वडिलांनाहि समजेल व त्यामुळें केशवकडे घरच्या लोकांचें अधिक लक्ष राहील. " एकानें सुचविलें.

" दंड करणें म्हणजे वडिलांनाच शिक्षा होईल. त्यापेक्षां केशवालाच प्रत्येक गृहपाठासाठीं एक एक छडी मारावी. यामुळें त्याला चांगली आठवण राहील. " दुसरा सभासद निर्भीडपणें बोलला.

" त्यानें चूक कबूल केली आहे. त्याला पश्चात्तापहि झाल्यासारखा दिसतो आहे. मग आणखी शिक्षाच केली पाहिजे असें नाहीं. " तिसरा सभासद बोलला.

" पश्चात्ताप झाल्यावर आणखी शिक्षा नको हें खरें आहे. पण तो खरा पश्चात्ताप आहे हें कशावरून ठरवावयाचें ? " चौथ्या सभासदानें शंका विचारली. "

" शिक्षा कशासाठीं करावयाची ? केवळ वळण लावण्यासाठीं. दंड केल्यावर, मार दिल्यावर किंवा तसेंच सोडून दिल्यावर केशवला आठवण कशाची राहील ?—दंडाची, छड्या मारल्याची किंवा अजीबात सोडून

दिल्याची. यामुळें त्याला नेमकें, नीट वळण लागेलच असें नाहीं. त्यापेक्षां आपण त्याला असें काम देऊं कीं, त्याला त्याच्या चुकीची रोज जाणीव व्हावी व रोज त्याची चूक थोडी थोडी दुरुस्तहि होत जावी. असें कोणतें काम देतां येईल तें ठरवा. ''

* * *

" सारे सभासद विचार करूं लागले. पांच मिनिटें विचार करण्यासाठीं दिलीं होतीं. सभेंत शांतता होती. प्रत्येकजण गंभीर होता. " कोणतें काम मिळणार ? " या प्रश्नानें साऱ्यांच्या मनांत कुतूहल निर्माण केलें होतें.

" केशवनें सारें लेखन-कार्य आठ दिवसांत संपवून शिक्षकांकडे सादर करावें. " एक सभासद म्हणाला.

" एकदांच लिहून भागणार नाहीं; चागलें दहा वेळां लिहायला पाहिजे." दुसऱ्यानें पुष्टी जोडली.

हें काम तर त्यानें केलेंच पाहिजे. ही कांहीं शिक्षा होत नाहीं. यापेक्षां त्याला इतर लेखन-कार्य दिलें पाहिजे. वाचनालयांतला रोजचा वार्ताफलक केशवनें निदान पंधरा दिवस लिहावा." तिसऱ्यानें सूचना केली.

अशा आठ-दहा सूचना आल्या. साधारण पांच मिनिटें तरी यांत गेली. नंतर गुरुजी व चिटणिस यांनीं मिळून एक निकालपत्र तयार केलें चिटणिसांनीं तें निकाल-पत्र वाचून दाखविलें.

**" केशव देसाई यानें सर्व चुका कबूल केल्यामुळें त्याला हें न्यायालय शाबासकी देत आहे. पण त्याच्या रोजच्या वर्तनांत सुधारणा व्हावी म्हणून त्यानें आजपासून पंधरा दिवसांत खालील कामें करावयाचीं आहेत—**

**( १ ) सर्व रचनापाठ, गृहपाठ त्यानें स्वतःच्या बुद्धीनें लिहावे व तसें केल्याचें प्रशस्तिपत्र न्यायालयाकडे सादर करावें.**

**( २ ) झालेल्या चुकाबद्दल त्यानें वडिलांकडून क्षमा मिळवावी व तसें केल्याचें वडिलांचें पत्र वर्गाच्या गुरुजींकडे सादर करावें.**

**(३) वाचनालयांतला वार्ताफलक त्यानें न चुकतां, पंधरा दिवस लिहावा.**

"केशव, तुला ही शिक्षा मान्य होईल ना?"

केशव अगोदरच शरमला होता. चिटणिसांनीं विचारलेल्या प्रश्नानें तर तो अर्धमेलाच झाला. त्यानें खालीं पाहून मानेनेंच होकार दिला.

मग गुरुजी म्हणाले, "आमचा न्यायालयाचा पहिलाच दिवस. त्या मानानें तुम्ही साऱ्यांनींच कामें चांगलीं केलीं. आजचें काम संपलें. राहिलेल्या तक्रारींचा उद्यां विचार करूं. मुलांनों, तुम्हाला मुद्दामच आज येथें येण्याची परवानगी दिली होती. येथें काम कसें चालेल; शिक्षा कशा दिल्या जातील; चूक करणाऱ्या मुलाला येथें काय वाटेल—या साऱ्या गोष्टी तुम्ही पहाव्या हाच खरा हेतू आज होता. आजच्या प्रसंगामुळें चूक न करण्याचाच संदेश तुम्ही घ्यावा. आपण चुका करतों; म्हणून न्यायालयाची जरूरी वाटते. चुकाच झाल्या नाहींत तर मग न्यायालयाला काम कसलें? आपल्या शाळेंत मुलांकडून चुकाच होत नाहींत म्हणून जर हें न्यायालय बंद करावें लागलें तर खरोखर सुरेख होईल. असें करणें तुमच्याच हातीं आहे. तुम्ही चूक करूं नका व कोणाला करूं देऊं नका. आजच्या कार्याबद्दल तुम्हां साऱ्यांना धन्यवाद. आजचें काम संपलें. न्यायालय आतां बरखास्त."

* * *

तेथून सारीं मुलें बाहेर पडलीं. वसंत, केशव देसाईकडे गेला. त्याला बरोबर घेऊन तो घरीं गेला. केशवाला खूपच पश्चात्ताप झाला होता. 'तो मनांतून चिडला असेल,—ही वसंताची कल्पना अगदीं खोटी ठरली होती. न्यायालयाला व न्यायालय निर्माण करणाऱ्या त्याच्या शाळेला त्यानें मनांतल्या मनांत धन्यवाद दिले. परत जातांना केशव त्याला म्हणाला, "वसंत, मी सारें करीन व सुधारेन पण तूं मात्र रोज मला मदत कर. माझ्यावर नजर ठेव.

"जरूर, जरूर. तूं तर आतां माझा खास मित्र झाला आहेस. बरें, नमस्कार." वसंत म्हणाला. केशव नमस्कार करून उत्साहित मनानें घरीं गेला.

## अभ्यास

( १ ) ' मुलांचें न्यायालय ' म्हणजे काय ? या न्यायाचा मुख्य उद्देश कोणता ?

( २ ) न्यायालयाचे सभासद किती होते ? ते कसे निवडले जात ? त्यांचें कोणतें काम होतें ?

( ३ ) न्यायालयासमोर कोणती तक्रार आणली होती ? कोणी आणली होती ? कोणाच्या विरुद्ध ? न्यायालयानें कोणता निर्णय दिला ?

( ४ ) मुख्याध्यापक व श्री. देशपांडे गुरुजी यांच्या भाषणांतील मुद्दे सांगा.

( ५ ) तुमच्या वर्गासाठीं एक न्यायालय तयार करा. या न्यायालयासमोर मांडायला एक तक्रार लिहून काढा.

( ६ ) " माझी पहिली मोठी चूक व ती कशी सुधारली ? " हें सांगणारें एक छोटेसें भाषण तयार करा.



# ६

# मुलांनी शाळा चालविली!



एका लहानशा शहराच्या शाळेंतील हा प्रसंग आहे. शाळा मोठी व्यवस्थित होती, वर्गांचे अभ्यास व इतर अनेक कार्यक्रम यांची सांगड घालण्याची हातोटी त्या शाळेला चांगली साधली होती.

'नवरात्राचे दिवस होते. शाळेंतील 'स्वराज्यसभे'मार्फत शाळेंत सरस्वत्युत्सव सुरू होता. लेखन, चित्रण, वक्तृत्व व इतर कलाकौशल्य यांसाठीं रोज चढाओढी सुरू होत्या. रोज सकाळीं व सायंकाळीं प्रवचनें होत होतीं. वर्गहि नेहमींप्रमाणें सुरूच होते.

या नऊ दिवसांत एक दिवस 'विद्यार्थी-दिन' म्हणून साजरा करावयाचा होता. त्या दिवशीं सबंध शाळेचा कारभार मुलांकडे असावयाचा असें ठरलें होतें. मुख्याध्यापक, शिक्षक, शिपाई यांचीं कामें मुलेंच करणार होतीं. यासाठीं स्वराज्यसभेनें गेल्या पंधरा-वीस दिवसांत एक योजना तयार केली होती.

नवरात्राच्या शेवटल्या दिवशीं हा दिन साजरा व्हावयाचा होता. मुलांना तर हा दिवस 'कधीं येतो' असें झालें होतें. कांहीं पालकांनाहि या दिनानिमित्त निमंत्रण केलें होतें.

रामू लवकरच उठला. त्यानें चटचट सारीं कामें आटोपलीं व वडिलांकडे जाऊन म्हणाला, "दादा, आज आमच्या शाळेंत खूपच मजा आहे! तुम्ही येणार ना पाहायला! तुम्हांला मुद्दाम बोलावलें आहे."

"अरे, कसली मजा! तुमचा विद्यार्थी-दिन ना? तो मला माहीत आहे चांगला. सगळ्यांनीं एकत्र यायचें अन् एक व्याख्यान ऐकायचें. हाच ना विद्यार्थी-दिन?" दादांनीं रामूला विचारलें.

"छे! छे! तुम्हांला त्यांतलें कळालेलें दिसत नाहीं. आज सबंध शाळा आमच्या ताब्यांत. आम्हीच चालवणार आज शाळा. आहे कीं नाहीं मजा? मग याल तुम्ही पाहायला!" रामू म्हणाला.

"वा! मग आजची शाळा पहायलाच नको. शिक्षक असतांना तुम्ही लोक नीट वागत नाहीं; मग आज तर सारे वर्गच तुम्ही डोक्यावर घ्याल. न आलेलेंच बरें!" दादांनीं रामूला मुद्दामच चिडविलें.

"तुम्ही येऊन तर पहा. आमची अगदीं जय्यत तयारी आहे. आमचे मुख्याध्यापक, शिक्षक आम्ही नेमले आहेत. तुम्ही आलेंच पाहिजे." रामूनें दादांना आग्रह केला.

"बरें. मी येतोंच. आंघोळ आटोपून घेतों. मग आपण बरोबरच जाऊं."

* * *

थोड्याच वेळानें दादा व रामू शाळेंत जायला निघाले. वाटेंत आजच्या कार्यक्रमाबद्दलच ते बोलत होते. रामू मोठ्या उत्साहानें दादांच्या प्रश्नांची उत्तरें देत होता.

लवकरच ते शाळेजवळ आले. फाटकाजवळ एक मोठा मुलगा उभा होता. त्याचें वय फार तर १३-१४ वर्षांचें असेल. सावळा रंग, मोठे डोळे व धारदार नाक—पाहतांक्षणींच त्याच्याबद्दल चांगलें मत होईल. तो थोडासा पुढें आला व त्यानें दादांना नमस्कार केला. तो म्हणाला—

" आपण रामूचे दादा ना ? आपल्याला शाळेंत आणायचें त्यानें कबूल केलें होतें. रामू, तूं आतां जा तुझ्या वर्गात. मी दाखवतों दादांना आपली शाळा. दादा, मी आज आमच्या शाळेचा मुख्याध्यापक आहे. चला, आपल्याला शाळा दाखवतों. "

दादांनींहि नमस्कार केला. विश्राम जाधवाचें—मुख्याध्यापकांचें—बोलणें ऐकून त्यांना मोठी मौज वाटली. त्यांनीं त्याला विचारलें—" अहो मुख्याध्यापक, तुम्ही शाळा दाखविणार म्हणजे काय मला वर्गावर्गातून फिरविणार; असेंच ना ?

" हे बघा दादा, मला आपण विश्रामच म्हणा. मी आजच्यापुरता मुख्याध्यापक आहे. तुमच्या आवडीचा एकदा विषय सांगा. म्हणजे त्या विषयाच्या तासालाच आपल्याला वर्गात नेईन. " विश्राम म्हणाला.

" छे ! छे ! तसें कांहीं नको. त्यापेक्षां आपण साऱ्याच वर्गात जाऊं. पाहूं तरी मुलेंच कसे वर्ग चालवितात तें. पण तुमचे नेहमींचे मुख्याध्यापक कोठें आहेत ?" दादांनीं विचारलें.

" ते अद्यापि आले नाहींत. त्यांच्या सवडीनें ते येतील. संध्याकाळीं शाळा सुटायच्या वेळेला मात्र ते नक्कीच हजर राहणार आहेत. चला, जाऊं आपण वर्ग बघायला. कचेरींत केशवराव भोसले बसले आहेत. त्यांनाहि घेऊं."

दादा, केशवराव यांना घेऊन मुख्याध्यापक शाळा दाखवूं लागले. छोट्याशा बागेंतूनच वर्गाकडे जावें लागत होतें. ती बाग दाखवून मुख्याध्यापक म्हणाले,

" ही आमची छोटीशी बाग आहे. इयत्ता पांचवींत गुलाब पाटील नांवाचा एक मुलगा आहे. तो आमच्या बाग-समितीचा मुख्य आहे. तोच हें काम पहातो. गुरुजींची देखरेख, मार्गदर्शन मात्र आहेच. "

" एकटा गुलाब हें काम करतो ? आश्चर्यच आहे, नाहीं ? केशवरावांनीं विचारलें.

" एकटा गुलाब कसें करील ! सारेच वर्ग पाळीपाळीनें काम करतात. त्यांच्या वेळापत्रकांत त्यासाठीं तास आहेच; पण आपल्या वर्गाचें काम खूप चांगलें व्हावें म्हणून सारे वर्ग इतर वेळींहि काम करतात. गुलाब आमच्या

स्वराज्यांतला शेतकी-मंत्री आहे. तो सारी व्यवस्था पहातो." मुख्याध्यापकांनीं खुलासा केला.

"तुमचें स्वराज्य? म्हणजे काय?" दादांनीं विचारलें.

"आम्हां मुलांचें स्वराज्य आहे ना. आमची शाळा हा जणूं एक गांवच– हें आम्हांला गुरुजींनीं पटवून दिलें आहे. या गांवांतली व्यवस्था आम्हींच पहायची. आपल्या शाळेचीं सारीं कामें आपणच करायचीं हेंच आमचें स्वराज्य!" मुख्याध्यापकांनीं उत्तर दिलें.

"तुमच्या शाळेंतलीं मुलें किती लहान! अन् तीं अशीं कोणकोणतीं कामें करणार!" दादा उद्‌गारले.

"आमचे वर्ग आम्हींच साफ करतों. पाळीपाळीनें शाळेचें आवारहि आम्हींच साफ करतों. फळ्यावर रोजच्या बातम्या आम्हींच लिहितों. मोठीं मुलें लहान मुलांचे खेळाचे तास घेतात. आमचें 'सहकारी दुकान' मुलेंच चालवितात. शाळेंतले उत्सव आमच्या जबाबदारीवर आम्ही पार पाडतों. खेळांच्या शर्यती, सहली, महत्त्वाचे दिन यांची व्यवस्था आम्हीच पहातों. गुरुजींचें मार्गदर्शन मात्र खूप मिळतें."

"वा! सुरेख! पण हें सारें चांगलें जमतें कां तुम्हांला?" केशवरावांनीं विचारलें.

"तें मी कसें सांगूं? आतां प्रत्यक्ष पहाच कीं आपण. आज तर सबंध शाळाच आमच्या ताब्यांत आहे. आम्हीच शिक्षक; आम्हीच गडी व आम्हीच विद्यार्थी. आमचे मुख्याध्यापक शाळा सुटायच्या वेळेलाच आमच्यांत येतील."

× × ×

असें बोलत बोलत ते निरनिराळ्या वर्गांवरून जाऊं लागले. एका वर्गांत एक छोटासा मुलगा—वय फार तर १०-११ असेल—तास घेत होता. दादा मोठ्या कौतुकानें व उत्सुकतेनें त्या वर्गांत शिरले.

तो वर्ग होता इयत्ता ४ थीचा. तो मुलगा एक गोष्ट सांगत होता. गोष्ट सांगण्याची त्याची पद्धत आकर्षक होती. सारा वर्ग शान्त होता. गोष्ट सांगून झाल्यावर त्यानें जेव्हां प्रश्न विचारायला सुरुवात केली तेव्हां दादांना व केशवरावांना आश्चर्यच वाटलें.

" अहो हा तर अगदीं शिक्षकाप्रमाणेंच तास घेत आहे. हें याला शिकविलें कोणी? अन् तुम्हांला याची शिक्षक म्हणून निवड तरी इतकी बरोबर कशी साधली ? " दादांनीं विचारलें.

" वर्गाच्या बाहेर गेलों म्हणजे सांगतों. " मुख्याध्यापक म्हणाले. ते वर्गाबाहेर आले.

" हें काम कांहीं एकदम साधलें नाहीं. " मुख्याध्यापक बोलूं लागले. " आम्ही प्रथम मुलांकडून आमच्या ठराविक छापील नमुन्याप्रमाणें अर्ज मागविले. ते अर्ज एकूण ७५ होते. यांतून स्वराज्य सभेच्या साधारण सभेनें ५० निवडले. मग मंत्रिमंडळानें त्यांतले ४० निश्चित केले व मुख्याध्यपकांनीं व आमच्या सभेच्या सल्लागार गुरुजींनीं मिळून शेवटली २५ शिक्षकांची निवड केली. "

" तुमच्या या निवडींत शेवटपर्यंत टिकणें कठीणच आहे. " केशवरावांनीं शेरा मारला.

असें बोलत बोलत ते सर्व वर्गावरून गेले. साऱ्या वर्गांत मुलेंच शिकवीत होतीं. वर्ग छान चालले होते. कविता, इतिहास, भूगोल, शास्त्र असे वेगवेगळे विषयहि त्यांना पहावयास मिळाले. वेळ केव्हां गेला हें समजलें सुद्धां नाहीं.

इतक्यांत एक टोल झाला. मुलें आपापल्या जागांवर एकदम उभीं राहिलीं. एकदम शांतता पसरली. इतकें शान्त झालें कीं, टांचणी पडली तर आवाज ऐकूं येईल.

पुन्हां एक टोल झाला. एका मुलानें गोड आवाजांत ' वंदे मातरम् ' म्हटलें. वर्गांतले तास संपल्याची ही रोजची सुंदर, गंभीर सूचना होती. मुलांनीं आपापलीं पुस्तकें पिशवींत घातलीं. कपडे नीट केले व घंटेची प्रतीक्षा करूं लागले.

लगेच गजर झाला. मुलें भराभर बाहेर पडलीं. झटपट जाऊन रांगेंत उभीं राहिलीं. सारीं साडेतीनशें मुलें तीन मिनिटांत कवाइतीला तयार झालीं. शाळेचें वृंदवादनाचें पथक होतें. सुस्वर, गंभीर आवाजांत वृंदवादन सुरू झालें. चार पांच क्षण फार तर गेले असतील; अन् एकदम सारीं मुलें न चुकतां पूर्ण तालांत कवाइतीचे हात करूं लागलीं.

'कवाईत' कोण घेतो आहे हें पहाण्यासाठीं केशवरावांनीं सगळीकडे पाहिलें पण मुलांसमोर हुकूम सोडायला कोणीच नव्हतें. त्यांना मुलांच्या या शिस्तीचें अतिशय कौतुक वाटलें. जशी कवाईत एकदम सुरू झाली तशीच ती एकदम बंदहि झाली. कवाईत थांबल्यावर विश्राम जाधवानें छोटेंसें भाषण केलें. तो म्हणाला—

"बंधूंनो व भगिनींनो, आज आपला विद्यार्थी दिन. एरव्हीं शाळा फार तर पांच तास भरते. आज आपण एकूण आठ तासांचा कार्यक्रम केला. आजचे व्याख्याते, शिक्षक, शिपाई यांचा मी फार फार आभारी आहे. सकाळपासून पाहुणेहि भेट देऊन गेले. त्यांनीं आजच्या कार्यक्रमांत जें लक्ष घातलें व वेळोवेळीं आमचें कौतुक केलें त्याबद्दल आपल्या शाळेतर्फे मी त्यांचा फार आभारी आहें. शेवटीं आभार तुम्हां सर्वच मुलांचे. तुमच्या-शिवाय आजचा कोणताच कार्यक्रम पार पडला नसता. तुम्हां सर्वांना धन्यवाद !"

नंतर मुलें घरोघर गेलीं. विश्राम जाधवानें दादांना व केशवरावांना मुख्याध्यापकांकडे नेलें. तो म्हणाला,

"ते आलेत पहा आमचे मुख्याध्यापक. आतां पुन्हां मी नेहमींचा विश्राम जाधव बरें कां ! मीं इयत्ता सातवींत आहे. येतो; नमस्कार !"

दादांनीं मुख्याध्यापकांना नमस्कार केला. ते त्यांना म्हणाले, "तुमची शाळा मला खरोखरच फार फार आवडली. किती सुरेख कामें करतात मुलें ! असेंच वळण यांना पुढेंहि मिळेल तर हीं मुलें देशाचीं मोठमोठीं कामें पार पाडतील. तुमचा विश्राम तर फारच गोड मुलगा आहे."

"वा, तो तर आमचा पंतप्रधान ! आज आमचा विद्यार्थी-दिन. मुलांच्या स्वराज्यांत हा मोठा महत्त्वाचा दिवस ! शिवाय हा आठवडा सरस्वत्युत्सवाचा. आज मुलांना कामाची संवय झाली अन् खरा खरा स्वाध्यायहि झाला; नाहीं कां ?" मुख्याध्यापकांनीं विचारलें.

"होय तर ! मुलें शिस्तीचीं आहेत. त्यांना कामाची जाणीव आहे. असें शिक्षण मिळणाऱ्या शाळेंत माझा मुलगा शिकतो याचा मला अभिमान वाटतो. बरें आहे; येतों, नमस्कार."

दादा व केशवराव त्यांना नमस्कार करून निघाले. फाटकापर्यंत मुख्याध्यापकहि पोहोंचवायला गेले. ते म्हणाले, " या. असेंच वारंवार येत जा व मुलांना उत्तेजन देत जा. मुलांच्या कार्यावर घरीं पण लक्ष ठेवा. नमस्कार."

## अभ्यास

( १ ) मुलांचें स्वराज्य म्हणजे काय ? हें स्वराज्य कोठलें ?

( २ ) दादांच्या व केशवरावांच्या मनांत कोणकोणत्या शंका आल्या ? अशा शंका कां आल्या असाव्यात ? त्या शंका खऱ्या ठरल्या कां ? कां ?

( ३ ) शाळेंत फिरल्यावर दादांना कोणकोणत्या गोष्टी विशेष आहेत असें वाटलें ? कां ?

( ४ ) नवरात्र म्हणजे काय ? विद्यार्थी-दिन या नवरात्रांत ठेवण्याचा उद्देश कोणता ?

( ५ ) तुम्ही तुमच्या शाळेचा अथवा वर्गाचा असा विद्यार्थीदिन साजरा करा. त्याचा अहवाल लिहा.

( ६ ) सांगड घालणें, वर्ग डोक्यावर घेणें, वर्ग चालविणें, मार्गदर्शन, सहकारी, आकर्षक, साधारण सभा, स्वाध्याय यांचा अर्थ सांगा व वाक्यांत उपयोग करा.

( ७ ) " शाळा म्हणजे छोटेंसें गांवच. " यावर एक लहानसें भाषण तयार करा.



# ७

# घरचे आहेर



शाळेच्या आवारांत मुलें कसकशीं कामें करतात हें गेल्या सहा प्रकरणांत पाहिलें. या प्रकरणांत शाळेंतल्या मुलांनींच आपापल्या दैनंदिनींत स्वराज्या-बद्दल काय काय लिहून ठेवलें आहे हें पहायला मिळेल. या दैनंदिन्यांमधील अभिप्राय म्हणजे घरचेच आहेर आहेत.

१

आजची आमची सहल म्हणजे खरोखरच नमुनेदार झाली. सहलीसाठीं निरनिराळ्या समित्यांकडे कामें सोंपवून दिलीं होतीं. वाहतूक समिति, क्रीडा-समिति, भोजन समिति, करमणूक समिति—या सर्वच समित्यांनीं चांगलीं कामें केलीं; पण भोजन-समितीनें फारच उत्तम काम केलें. शिधा जमविण्या-पासून तों जेवून उठेपर्यंत किती बिनबोभाट कामें झालीं ! जेवण सार्वेच

पण रुचकर होतें; वाढपहि सुरेख. श्लोक म्हणणें, पाणी काढणें यांसारखीं कामें देखील अगोदरच नेमून दिलेलीं. गोंधळ कसलाच नाहीं. गटप्रमुखांचें सहकार्य या समितीला चांगलें मिळालें होतें.

संपूर्ण योजना तयार करून सर्वांच्या सहकार्यानें कशी सहल यशस्वी करावी हें आजच्या सहलीनें शिकविलें.

आजच्या सहलींत दोष नव्हतेच असें नाहीं. गणपत व हरि यांचें भांडण वहातूक-समितीच्या प्रमुखानें मोठ्या कौशल्यानें मिटविलें नसतें तर सहलींत चांगलाच दोष निर्माण झाला असता. सर्व मुलांनीं स्वतः होऊन कामें करायला पाहिजेत; असें मात्र फार थोड्या प्रसंगीं झालें.

—विनायक गांवकर

## २

आज आमच्या शारीरिक शिक्षण सप्ताहाचा शेवटला दिवस होता. सामन्यांची व्यवस्था, सांघिक कवाईत व सभेची व्यवस्था आम्हां मुलांकडे सोंपविली होती. सामन्यांची व्यवस्था करणें म्हणजे अतिकठिण काम आहे. क्रीडांगण आंखून तयार करणें, साहित्य पुरविणें, प्रेक्षकांची बसावयाची व्यवस्था करणें, निर्णय लिहिणें, प्रथमोपचाराची तयारी ठेवणें हीं सारीं कामें करायला खूप स्वयंसेवक पाहिजेत व त्यांच्यांतहि खूप सहकार्य पाहिजे.

स्वयंसेवक-पथकाचा प्रमुख गणपत देशमुख याला त्रिवार धन्यवाद! किती चोख आणि किती तत्पर! एकदांहि असें घडलें नाहीं कीं अमक्या कार्याला स्वयंसेवक मिळाला नाहीं. सर्व ठिकाणीं स्वयंसेवक अगदीं योग्य वेळीं हजर असायचेच.

आजचे आमचे पाहुणे श्री. रा. रा. दिवाकरपंत सरदार हे होते. त्यांनींहि मुलांनीं ठेवलेल्या व्यवस्थेचें कौतुक केलें. आमच्या सर्व समित्यांची त्यांना ओळख करून दिली तेव्हां तर 'मूठभर मांस' माझ्या अंगावर चढल्याचा भास झाला.

माझ्याकडे 'कवाइती' चें काम होतें. सर्व संघनायकांचें मला चांगलें सहकार्य मिळालें होतें. प्रत्येकानें आपल्या ताफ्यांत असलेल्या दोन दोन

रांगांची संपूर्ण जबाबदारी सुरेख पार पाडली. क्रीडांगण आखून ठेवणें, ध्वजांची व्यवस्था ठेवणें, वृंदवादनाच्या पथकाची जागा तयार करणें इत्यादि सारीं कामें करण्यांत त्यांनीं खूप खूप मदत केली. मुलेंहि वेळेवर आलीं व आपापल्या ठरलेल्या ठिकाणीं जाऊन उभीं राहिलीं. मला तरी आज खूप समाधान वाटलें. पुढच्या वर्षीं यापेक्षां नवीन कांहीं तरी करावें असें आतांच वाटूं लागलें आहे.

—हिंमत पाटील

३

आज आमच्या स्वराज्यसभेची सहल होती. सहलीचा उद्देश 'भटकणें' असें म्हणतात. तसें भटकणें मात्र आज नव्हतें. आम्हा बारा सभासदांना एका खेड्याची पाहणी करायला सांगितलें होतें. आमच्या मुख्य मंत्र्यानें अगोदरच कार्याची वांटणी करून ठेविली होती.

गांव छोटेंसें होतें. १५६ घरांची वस्ती. लोकसंख्या ७६८ होती. गांवाचे सहा भाग पाडून आम्ही दोघादोघांनीं एक एक भाग वांटून घेतला.

साक्षरता, राहणी, लोकांचें खर्चाचें मान, उत्पन्न, व्यसनें, गांवांतल्या संस्था, रोगराई, शेतीचे प्रकार अशा किती तरी गोष्टींची माहिती आम्हांस काढावयाची होती. पण आमचा मुख्य मंत्री मोठा चांगला कार्यकर्ता आहे. त्यानें तेथील लोकांचें सहकार्य उत्तम मिळेल अशी अगोदरच सोय करून ठेविली होती.

सारी माहिती जमा करायला आम्हांला सायंकाळचे पांच वाजले. त्यानंतर आम्ही तेथील गांवकऱ्यांसाठीं एक करमणुकीचा कार्यक्रम केला. पोवाडे, गाणीं, संवाद असा एक तासाचा कार्यक्रम झाला. तेथल्या दोन तीन माणसांनीं पण खेडुतांचीं गाणीं म्हटलीं आम्ही तीं गाणीं लिहून आणलीं आहेत. आमचे गुरुजी अशा गाण्यांना 'लोकगीतें' म्हणतात.

सायंकाळचें जेवण तेथेंच झालें. रात्रीं ९ चे सुमारास आम्ही परतलों. आमच्याच जबाबदारीवर पार पडलेलें असें हें पहिलेंच कार्य होतें. एरव्हीं

अनुक्रम
विभाग
क्रमांक



गुरुजी निदान बरोबर असत; पण आज सारीच योजना आम्हीं केली व आमच्या सर्वांनींच आम्हीं पार पाडली.

काम पार पाडल्याचें समाधान वाटत होतें पण मनाला तेथील स्थिति पाहून वाईटहि वाटत होतें. मनांत सारखा विचार येई—हे हजारों लोक शिकणार केव्हां व आपला सबंध देश चांगला होणार केव्हां ?

—गणेश पांडे

## ४

आज साऱ्या देशांत वृक्षारोपण दिन साजरा केला गेला. शाळेनें एकूण ऐंशी रोपें आणलीं होतीं. शाळेचें आवार, आठवडे बाजार, ग्रामपंचायतीच्या कचेरीसमोरील अंगण या ठिकाणीं झाडें लावावयाचीं होतीं. आमच्या स्वराज्य-सभेच्या बैठकींत या योजनेचा विचार केला होता. नुसतीं झाडें लावून भागत नाहीं तर त्याची निगा पण राखली पाहिजे ही गोष्ट आतां आम्हांला पटली होती. गेल्या वर्षीं लावलेल्या झाडांपैकीं किती तरी झाडें मेलीं होतीं !

आज सकाळीं ९ वाजतां सारीं झाडें लावलीं गेलीं. माझ्या वांट्याला दोन झाडें आलीं. शाळेतल्या आवारांतील झाडांपैकीं आमच्या वर्गाकडे पांच झाडें जगवायचें व वाढवावयाचें काम आलें आहे. चाळीस मुलांना मात्र झाडें वाढविणें कठिण नाहीं. फार तर रोज एक तास काम करावें लागेल. मागच्या वर्षीं श्री. महाजन गुरुजींनीं एकट्यानें दहा झाडें लावलीं होतीं व तीं सारींचीं सारीं त्यांनीं जगविलीं.

आम्हां सर्व मुलांना मिळून हीं झाडें जगवितां आलीं नाहींत तर मग कसलें स्वराज्य ! कोणी कामें करणार नाहीं असें यंदा होणार नाहीं. पण तसें झालेंच तर मी एकटा हीं पांच झाडें वाढवीन.

—मुरलीधर नेमाडे

## ५

आज लोकसत्ताक-दिन होता. शाळेंत कालपासूनच या दिनासाठीं कामाची गर्दी झाली होती. सकाळीं सहा वाजतां मुलांना शाळेंत बोलाविलें

होतें. या वेळीं स्वराज्यसभेकडे काम न देतां प्रत्येक वर्गासाठीं स्वतंत्र समिति होती. वर्ग वेळेवर हजर ठेवणें, प्रभात-फेरीच्या वेळीं प्रत्येक वर्गानें एक नवीन गाणें सांगणें, सभेच्या वेळीं प्रत्येक वर्गातर्फे एक संवाद करणें व एका मुलानें भाषण करणें, प्रत्येक वर्गानें येत्या २६ जानेवारीपर्यंत पाळावयाची शपथ घेणें इत्यादि कार्यक्रम त्या समितीनें पार पाडावयाचे होते. आमच्या वर्गाची ( सहावीची ) तयारी चांगली झाली होती; पण गाणें सांगणाऱ्याचा आवाज चांगला खडा नव्हता.

पांचवीच्या वर्गानें आज फारच चांगलें कार्य केलें. त्यांनीं निवडलेलें गाणें " उभवूं या भारत " खरोखरच गोड होतें. आपल्या प्रिय भारता-साठीं आपण काय काय करायला पाहिजे हें सारें मोठें सुंदर रीतीनें सांगितलें आहे. ' भारतमातेचें दर्शन ' हा संवादहि किती परिणामकारक झाला ! मला तर वाटतें कीं पांचवीच्या समितीला त्यांच्या गुरुजींनीं खास मदत केली असली पाहिजे. तसें असेल तर मग त्यांचें कांहीं खरें स्वराज्य नाहीं.

कुवतीच्या मानानें पहिली–दुसरीच्या मुलांनीं किती सुरेख कामें केलीं ! साऱ्यांनीच त्यांचें कौतुक केलें. त्यांना पहिलें बक्षीस जरी मिळालें नाहीं तरी जमलेल्या पाहुण्यांपैकीं पुष्कळांनीं बक्षिसें दिलीं व त्यांच्या धैर्याचें कौतुक केलें.

येत्या २६ जानेवारीपर्यंत ' रोज सकाळीं ५ वाजतां उठेन व नियमानें व्यायाम घेईन ' ही शपथ आमच्या वर्गानें घेतली आहे. १० वाजायला आले; आतां झोंपलेंच पाहिजे. नाहीं तर, वर्गाला वाईटपणा यावयाचा.

—हिरालाल बागूल

## अभ्यास

( १ ) कोणकोणत्या दिनांच्या नोंदी या उताऱ्यांत आलेल्या आहेत ? ते दिन कधीं येतात ? त्या दिनांना एवढें महत्त्व कां ?

( २ ) या नोंदींमध्यें कोणकोणत्या चांगल्या गोष्टी वर्णन केल्या आहेत ? कोणकोणते दोष आले आहेत ?


(३) चांगलीं कामें करण्यासाठीं कोणकोणत्या गुणांची जरूरी आहे? या नोंदींमध्यें ते गुण कोठें कोठें दिसून आलेत?

(४) तुम्ही दैनंदिनी लिहितां कां? कां? तुमच्या दैनंदिनींत तुम्ही कशा कशा बद्दल लिहाल?

(५) सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं झोंपेपर्यंत तुमची दिनचर्या लिहा.

(६) रुचकर, वाढप, गटप्रमुख, स्वयंसेवक, प्रेक्षक, पथक, लोकगीत, वृक्षारोपण, कुवत या शब्दांचे अर्थ द्या व वाक्यांत उपयोग करा.

म. ग्रं. सं. ठाणें,
3269
का. वा.



IRBK-0103269
IRBK-0103269

संग्रहालय
अनुक्रम 28530
विभाग का. वा.
क्रमांक 990
दि. 3/3/69